
मंगळवार, २६ जुलै २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

...तर ही वेळ आली नसती; दरेकरांचा ठाकरेंना टोला/२
महिलेचे फोटो व्हायरल करण्याची धमकी; आरोपीला अटक/५
कॅरम स्पर्धेत पनवेलचा सुरेश बिस्ट अजिंक्य/८

## मतदार ओळखपत्र-आधार कार्ड लिंक विशेष मोहीम




**मुंबई :** मतदार याद्यांचे प्रमाणीकरण, दुबार नावे वगळणे यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे मतदार ओळखपत्र आधार कार्डशी संलग्न करण्याची विशेष मोहीम राज्यभर १ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. मुख्य निवडणूक अधिकारी तथा अपर मुख्य सचिव श्रीकांत देशपांडे यांनी सोमवारी (दि. २५) मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मतदारांची ओळख पटवून देण्यासाठी आणि मतदार यादीतील नोंदी प्रमाणित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक केल्यास एकाच व्यक्तीचे नाव एकापेक्षा जास्त मतदारसंघात किंवा एकाच मतदारसंघात एकापेक्षा जास्त वेळा नोंदणी केल्यास ते शोधून काढणे सोपे होणार आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देणार

## द्रौपदी मुर्मू यांनी घेतली राष्ट्रपतिपदाची शपथ; अभिभाषणात झाल्या भावूक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी (दि. २५) देशाच्या १५व्या राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. यासोबतच देशाच्या पहिल्या आदिवासी आणि दुसऱ्या महिला राष्ट्रपती होण्याचा इतिहास मुर्मू यांनी रचला. यानंतर त्यांनी देशाला संबोधित केले. या वेळी त्यांनी महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.

संसदेतील सेंट्रल हॉलमध्ये झालेल्या या शपथविधी सोहळ्याला मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविंद, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रमुख नेते उपस्थित होते. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती भवनात पोहचल्यानंतर मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. मग देशाचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा यांनी मुर्मू यांना राष्ट्रपतिपदाची शपथ दिली.

या वेळी आपले पहिले अभिभाषण करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. भारतात



गरीब स्वप्नही पाहू शकतो व पूर्णही करू शकतो, असे उद्गार त्यांनी काढले.

राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, माझा जन्म ओडिशातील आदिवासी गावात झाला, पण देशाच्या लोकशाहीने मला इथपर्यंत पोहचवले. स्वतंत्र भारतात जन्मलेली मी देशाची पहिली राष्ट्रपती आहे. राष्ट्रपती होणे माझे वैयक्तिक यश नसून हे भारतातील प्रत्येक गरिबाचे यश आहे. आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी स्वतंत्र भारतातील नागरिकांकडून ज्या अपेक्षा ठेवल्या होत्या त्या पूर्ण करण्यासाठी आपल्याला या अमृत काळामध्ये वेगाने काम करावे लागेल. 'सबका प्रयास, सबका कर्तव्य' या मार्गावर वाटचाल करावी लागणार आहे.

प्रगतशील भारताचे नेतृत्व करताना मला अभिमान वाटत आहे. सर्व देशवासीयांना आणि खासकरून तरुण, महिलांना आश्वस्त करू इच्छिते की, त्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल. भारत आज प्रत्येक क्षेत्रात विकास करीत आहे. कोरोना काळात भारताने जे सामर्थ्य दाखवले, त्यामुळे संपूर्ण जगाला आपल्यासोबत पुढे नेण्याचे काम केले. आपण भारतीयांनी आपल्या प्रयत्नांनी फक्त जागतिक संकटाचा सामना केला नाही, तर जगासमोर नवे मापदंडही ठेवले. काही दिवसांपूर्वी आपण २०० कोटी डोस देण्याचा विक्रम केला आहे. या संपूर्ण लढाईत भारताने दाखवलेला संयम, साहस हे आपली शक्ती आणि संवदेनशीलतेचे प्रतीक आहे. भारताने जगालाही मदत केली. आज जग भारताकडे नव्या विश्वासाने पाहत आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती मुर्मू यांनी काढले.

देशातील महिला, मुली जास्तीत जास्त सक्षम झाल्या पाहिजेत. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी योगदान दिले पाहिजे. यासाठी तुम्हाला नेहमी पाठिंबा असेल, असे आश्वासन राष्ट्रपती मुर्मू यांनी दिले.

२६ जुलै हा कारगिल विजय दिवसही आहे. भारतीय सैन्याच्या शौर्य व संयम या दोन्हींचे तो प्रतीक आहे. मी कारगिल विजय दिवसानिमित्त देशाच्या सैन्याला आणि देशातील सर्व नागरिकांना शुभेच्छा देते, असे राष्ट्रपती म्हणाल्या.

आपले हित व हितापेक्षा मोठे जगाचे कल्याण करायचे असते. हा विश्वास पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न असेल. पुढे वाटचाल करून आत्मनिर्भर भारताची निर्मिती करूयात, असे त्या शेवटी म्हणाल्या.

# कामोठ्यात सकल हिंदू समाज पदयात्रा




आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभरात हिंदू नववर्ष शोभायात्रा, श्री रामनवमी, हनुमान जयंती मिरवणुकांवरील हल्ले, हिजाब आंदोलनापासून ते नुपूर शर्मा यांच्या समर्थकांचे झालेले खून या सर्व घटनांना वाचा फोडण्यासाठी कामोठ्यात रविवारी (दि. २४) सकल हिंदू समाज पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर सहभागी झाले होते.

देशात हिंदू लोकांचे सण आणि यात्रांवर होणाऱ्या हल्ल्यांचा निषेध करण्यासाठी हिंदू धर्मियांनी सकल हिंदू पदयात्रेचे आयोजन केले होते. कामोठे शहरात यानिमित्त पदयात्रा निघाली. या पदयात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मीय लोक सहभागी झाले होते.

हिंदू समाजावर अन्याय होत असेल आणि समाज शांत बसेल ही अपेक्षा केली जात असेल, तर हिंदू समाजाला याच्यापेक्षा तीव्र प्रतिक्रिया द्यावी लागेल, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले.

# संसदेचे पावसाळी अधिवेशन : काँग्रेसच्या चार खासदारांवर निलंबनाची कारवाई



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सोमवारी (दि. २५) काँग्रेसच्या चार खासदारांचे निलंबन करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ही कारवाई केली. यासह लोकसभेचे कामकाज उद्या २६ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.

काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभेत गोंधळ घालून महागाईविरोधात घोषणा दिल्याने त्यांना सभागृहातून निलंबित करण्यात आले आहे. या खासदारांमध्ये मणिकम टागोर, ज्योतिमणी, रम्या हरिदास आणि टीएन प्रतापन यांचा समावेश आहे. त्यांना संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आंदोलन न करण्याचा करण्याचा इशारा दिला होता, पण त्यानंतरही काँग्रेसच्या खासदारांनी आंदोलन सुरूच ठेवले. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

महागाईबाबत चर्चेसाठी दुपारी ३ नंतर तयार आहोत, पण सभागृहात फलक घेऊन केलेले आंदोलन सहन करणार नाही. तुम्हाला जर फलक दाखवून आंदोलन करायचे असेल, तर ते सभागृहाबाहेर करा. मी चर्चेसाठी तयार आहे. माझ्या दयाळूपणाला कमकुवतपणा समजू नका, असा इशारा लोकसभा अध्यक्षांनी दिला. त्यानंतर त्यांनी मंगळवारपर्यंत कामकाज तहकूब केले.

## निवडक

### कतरिना, विकी कौशलला धमकी देणारा अटकेत

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि तिचा पती तसेच अभिनेता विकी कौशलला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मनविंदर सिंग असे त्याचे नाव असून अभिनय क्षेत्रात ओळख निर्माण करू पाहणारा अगदीच नवखा कलाकार आहे. तो कतरिनाचा चाहताही आहे व कतरिनाशी लग्न करण्याचाही त्याचा मनसुबा होता.

### अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीची यादी ३ ऑगस्टला

**पुणे :** इयत्ता अकरावी प्रवेशाच्या पहिल्या नियमित फेरीसाठी पसंतीक्रम नोंदविण्यासाठी येत्या बुधवारपर्यंतची (दि. २७) मुदत देण्यात आली आहे. पहिल्या फेरीची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी गुरुवारी (दि. २८) प्रसिद्ध होणार असून अंतिम गुणवत्ता यादी ३ ऑगस्ट रोजी जाहीर होईल, असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# माजी मंत्री खोतकरांनी घेतली मुख्यमंत्री शिंदेंची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्याचे माजी राज्यमंत्री आणि जालन्याचे माजी आमदार अर्जुन खोतकर यांनी सोमवारी (दि. २५) दिल्लीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपला पाठिंबा जाहीर केला. तशी माहिती शिंदे गटाकडून देण्यात आली.

दिल्लीत अर्जुन खोतकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट झाली तेव्हा केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, खासदार राहुल शेवाळे, रोहिदास लोखंडे, हेमंत पाटील, प्रताप जाधव, धैर्यशील माने, कृपाल तुमाने आणि माजी मंत्री सदाभाऊ खोत हेही उपस्थित होते.



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण अंगिकारून एकनाथ शिंदे यांनी आपली वाटचाल सुरू केली आहे. त्यामुळे अर्जुन खोतकर यांनी मुख्यमंत्री शिंदेंचे हात भक्कम करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या शिवसेना-भाजप युती सरकारला पाठिंबा दिला आहे, अशी माहिती शिंदे गटाने दिली.

दरम्यान, पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत खासदार प्रताप जाधव यांची नुकतीच बुलडाणा जिल्हा संपर्कप्रमुख पदावरून हकालपट्टी करण्यात आलेली होती, मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सोमवारी खासदार जाधव यांची बुलडाणा जिल्हा संपर्कप्रमुखपदी पुनर्नियुक्ती केल्याचे जाहीर केले. हा शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांना आणखी एक शह आहे.

## धनुष्यबाण आमचाच

### -आमदार गुलाबराव पाटील

**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार गुलाबराव पाटील यांनी, आम्ही अद्याप शिवसेना सोडलेली नाही. त्यामुळे धनुष्यबाण आमचाच आहे, असे म्हटले आहे. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते.

शिवसेनचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण कोणाचा आहे? न्यायालयात काय निर्णय होईल? असे प्रश्न विचारले असता आमदार गुलाबराव पाटील म्हणाले, न्यायालयाच्या लढाईत आम्हाला फारसे बोलता येणार नाही, पण अशा स्थितीत कोणत्याही ठिकाणी सामान्यत: डोकी मोजली जातात आणि डोक्यांनाच महत्त्व असते तसेच आम्ही अद्याप शिवसेना पक्ष सोडलेला नाही. त्यामुळे असा संभ्रम कुणी तयार करीत असेल, तर तो करू नये. आम्ही पक्षांतर्गत हा उठाव केलेला आहे. पक्ष सोडला असता तर धनुष्यबाण कोणाचा, असा प्रश्न निर्माण झाला असता, पण आम्ही शिवसेना पक्ष सोडलेला नाही. त्यामुळे धनुष्यबाण आमचाच राहणार.

मंत्रिपद कधी मिळेल? किंवा न्यायालयात काय निर्णय लागेल याच्याशी आम्हाला काही देणे-घेणे नाहीये. आम्हाला शिवसेना वाचवायची आहे, असेही ते म्हणाले.

# गटारीसाठी फार्महाऊस सज्ज

## मांस, मद्यावर ताव मारण्यासाठी शौकीन उत्सुक

**पेण : प्रतिनिधी**

अवघ्या दोन दिवसांवर आलेली गटारी साजरी करण्यासाठी बेत आखले जाऊ लागले आहेत. याकरिता सुरक्षित मानले जाणाऱ्या फार्महाऊसना पसंती दिली जात आहे. एकीकडे मांस, मद्यावर ताव मारण्यासाठी शौकीन उत्सुक असताना दुसरीकडे पोलिसांचीही गैरकृत्यांकडे नजर असेल.

आषाढ महिन्यातील शेवटच्या दिवशी गटारी साजरी केली जाते. या दिवशी सर्रास मांसाहाराचा बेत आखला जातो. सोबत काही मंडळी मद्याचाही आस्वाद घेतात. यंदा गटारी बुधवारी (दि. २७) आहे. या पार्श्वभूमीवर गटारी साजरी करण्यासाठी जागेचा शोध घेतला जात असून अनेकांची पावले फार्महाऊसकडे वळू लागली आहेत. या निमित्ताने पावसाळ्यात बहरलेल्या निसर्गरम्य वातावरणात पार्टी करण्याचा विचार केला जात आहे.

### पोलिसांची राहणार नजर



बहुतांश लोक श्रावण महिन्यात मांसाहार करीत नाही. या काळात शुद्ध, सात्विक शाकाहारी अन्न ग्रहण केले जाते, तर काहीजण उपवासही करतात. श्रावण महिना हा पवित्र महिना मानला जात असल्याने मांसाहार, अल्कोहोलयुक्त पेये कटाक्षाने टाळली जातात. श्रावण महिना सुरू होण्यापूर्वी मांसाहार खाऊन व मद्य पिऊन खवय्ये गटारी साजरी करतात. यासाठी सज्ज्ता सुरू असून पोलीस यंत्रणाही सतर्क झाली असून सर्व घडामोडींवर ते लक्ष ठेवून आहेत.

## पुण्यात विमान कोसळून शिकाऊ वैमानिक जखमी

**पुणे : प्रतिनिधी**



पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात कडबनवाडी येथे एक विमान कोसळल्याची घटना सोमवारी (दि. २५) घडली. या दुर्घटनेत वैमानिक भावना राठोड या जखमी झाल्या असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात महिला वैमानिकांना प्रशिक्षण दिले जाते. सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे बारामती येथून एका विमानाने उड्डाण घेतले. त्यानंतर हे विमान इंदापूर येथील कडबनवाडी परिसरात आल्यावर त्यात काहीतरी तांत्रिक बिघाड उद्भवला आणि ते एका शेतात कोसळले.

विमान कोसळल्याचे दिसताच शेतामध्ये असलेल्या लोकांनी महिला वैमानिक भावना राठोड यांना बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. यानंतर घटनास्थळी पोलीस दाखल झाले. ही दुर्घटना नेमकी कशी घडली याबाबत माहिती घेतली जात आहे.

# रायगडातील नगर परिषदांची सुधारित आरक्षण सोडत गुरुवारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नऊ नगर परिषदांच्या आरक्षण सोडतीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित पालिका कार्यालयांमध्ये गुरुवारी (दि. २८) सोडत काढली जाणार आहे, तर हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी २९ जुलै ते १ ऑगस्ट असा कालावधी निश्चित करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगर परिषदांची सुधारित आरक्षण सोडत २८ जुलै सायंकाळी ४ वाजल्यापासून संबंधित पालिका कार्यालयात काढली जाईल. त्यानंतर आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना २९ जुलै ते १ ऑगस्टपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मागविता येतील.

या आदेशाद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व त्यामधील महिलांसाठी यापूर्वी निश्चित केलेल्या आरक्षणात कोणताही बदल होणार नाही, मात्र सर्वसाधारण महिलांचे सोडतीद्वारे काढलेले आरक्षण रद्द करण्यात आले आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.



### नऊ मनपांच्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या १३ ऑगस्टला होणार प्रसिद्ध

**मुंबई** : औरंगाबाद, लातूर, परभणी, चंद्रपूर, भिवंडी-निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा-भाईंदर आणि नांदेड-वाघाळा या नऊ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या १३ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यानंतर २२ ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत, तर प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या २ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जातील.

# ...तर ही वेळ आली नसती

## भाजप नेते प्रवीण दरेकर यांचा उद्धव ठाकरेंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

एकीकडे पक्षातील खासदार, आमदार, नगरसेवक शिंदे गटात सहभागी होत असताना दुसरीकडे शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दररोज शिवसेना भवनात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत आहेत. या वेळी उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांना मोठ्या प्रमाणात नोंदणी करण्याचे आदेश दिले आहेत. यावर भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी, उद्धव ठाकरे हे सत्ता असताना लोकांमध्ये गेले असते, पदाधिकारी-कार्यकर्त्यांशी संवाद साधला असता, तर आज गट्टे गोळा करण्याची वेळ आली नसती, असा टोला लगावला आहे.





उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांनी 'मविआ' सरकार पडल्यानंतर राज्यभरात दौरे करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील शिवडी-काळाचौकी येथे रविवारी (दि. २४) शिवसेनेच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी उद्धव ठाकरे यांनी, कार्यकर्त्यांना शिवसेनेमध्ये जास्तीत जास्त कार्यकर्त्यांची नोंदणी करून नोंदणीचे गट्टे घेऊन माझ्या वाढदिवसाला मला भेट म्हणून द्या, असा आदेश दिला. उद्धव ठाकरेंच्या या सूचनेनंतर भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी टीका केली आहे.

तुम्ही सत्ता असताना लोकांमध्ये गेला असतात, विविध ठिकाणी फिरले असता, तर आज गट्टे गोळा करण्याची वेळ आली नसती, असे प्रवीण दरेकर म्हणाले, तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या पाठीमागे गणपती बाप्पा उभे असून ही जोडी राज्याला दिशा देईल, असा विश्वासही प्रवीण दरेकर यांनी या वेळी व्यक्त केला.

# शिवसैनिकांनो, तुमच्या भावना भडकावल्या जाताहेत -दीपक केसरकर

**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार धैर्यशील माने यांच्या घरावर शिवसैनिकांनी मोर्चा काढल्यानंतर शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी सोमवारी (दि. २५) पत्रकार परिषद घेऊन शिवसैनिकांवर टीका केली आहे. खासदारांच्या घरावर मोर्चा काढायचा अधिकार तुम्हाला कोणी दिला, असा संतप्त सवाल त्यांनी शिवसैनिकांना विचारला आहे. तसेच तुमच्या भावना भडकवल्या जात आहे, याचा तुम्ही विचार करावा, असेही आवाहनही त्यांनी या वेळी शिवसैनिकांना केले आहे. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांनाही काही प्रश्न विचारले आहेत.



आमच्या खासदारांच्या घरावर शिवसैनिक मोर्चे निघत आहेत. त्यांच्या घरावर मोर्चा काढण्याचा अधिकार शिवसैनिकांना कोणी दिला? असे मोर्चे काढणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. महाराष्ट्रातल्या शिवसैनिकांनी लक्षात घेतले पाहिजे. आज तुमच्या भावना भडकावल्या जात आहे, त्याचा विचार करा, असे आवाहन त्यांनी शिवसैनिकांना केले.

एकनाथ शिंदेंनी मला मुख्यमंत्री पद नको, मात्र तुम्ही भाजपसोबत युती करा, अशी विनंती केली होती, हे खरे का? असा प्रश्न केसरकर यांनी उद्धव ठाकरे यांना विचारला, तसेच खासदार राहुल शेवाळेंनी सांगितल्याप्रमाणे उद्धव ठाकरे आणि नरेंद्र मोदी यांच्यात युतीची बोलणी सुरू होती, मात्र १२ आमदारांचे निलंबन केल्याने ही चर्चा फिसकटली, हे खरे आहे का? एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनवण्याचे आश्वासन बाळासाहेब ठाकरे यांनी दिले होते, मात्र ते स्वत: तुमच्याकडे येऊन आम्हाला हिंदुत्त्वासोबत जायचे आहे, असे म्हणाले होते. तेव्हा तुम्ही हिंदुत्त्वाबरोबर का गेला नाही, हे देखील उद्धव ठाकरेंनी सांगावे, असेही ते म्हणाले.

२०१४ साली राज्यात भाजपसोबत सत्तेत असताना, रोज सकाळी कोणतरी पत्रकार परिषद घ्यायचे आणि केंद्र सरकारवर टीका करायचे, हे योग्य नव्हते. तुम्ही ज्या पक्षासोबत सत्तेत आहात निदान त्यांच्याशी तरी संबंध चांगले ठेवायचे, अशी टीका त्यांनी नाव न घेता संजय राऊतांवर केली, तर युवासेनेचे प्रमुख आज मुंबईत फिरत आहेत. अनेक शाखांना भेटी देत आहेत, मात्र कालपर्यंत हे मुंबईतही दिसत नव्हते, असेही केसरकर म्हणाले.

## उपजिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया व उपचार शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा रुग्णालय अलिबाग व इंडियन असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक सर्जन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत इतर शस्त्रक्रिया करीत संदर्भीय केलेल्या बालकांचे शस्त्रक्रिया, निदान व उपचार शिबिर उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे रविवारी (दि. २४) झाले. या शिबिरामध्ये जिल्ह्यातील एकूण २० संदर्भित बालकांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, तसेच या शिबिरामध्ये हर्निया, हायड्रोसील, अपेंडिक्स, अनडिसेंडिंग टेस्टीज, फायमोसिस, टंग टाय या व अशा प्रकारच्या इतर शस्त्रक्रिया करण्यात येतात.



हे शस्त्रक्रिया शिबिर प्रत्येक महिन्यामध्ये आयोजित करण्यात येते. ज्या बालकांच्या शस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे करणे शक्य नाही, अशा शस्त्रक्रिया मुंबईतील सायन हॉस्पिटल व ठाणे येथील कौशल्य हॉस्पिटलमध्ये करण्यात येतात. या शिबिरामध्ये बालरोगतज्ज्ञ डॉ. संजय ओक, डॉ. राकेश शहा, डॉ. जयश्री कोरे या तज्ज्ञांमार्फत शस्त्रक्रिया करण्यात येतात. या शिबिराचे नियोजन रविवारी करण्यात येते. शिबिर यशस्वी करण्याकरीता उपजिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर यांनी मार्गदर्शन केले. वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पनवेल, डॉ. सचिन संकपाळ, शस्त्रक्रिया गृहामधील सर्व स्टाफ, इन्चार्ज स्टाफ, बालरोग तज्ज्ञ उपस्थित होते.

## 'इग्नु'मधील विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू

**पनवेल : वार्ताहर**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ जून २०२२ सुरू होणाऱ्या टर्म-एंड परीक्षा विद्यापीठाने देऊ केलेल्या विविध शैक्षणिक प्रोग्रामसाठी २२ जुलैपासून सुरू झाल्या आहेत, तसेच कारागृहातील कैद्यांसाठी विद्यापीठाने ८३१ परीक्षा केंद्रे स्थापन केली आहेत, ज्यात १८ परदेशातील केंद्रे आणि भारतातील ८२ केंद्रे आहेत.

एकूण ७,६९,४८२ पात्र विद्यार्थ्यांना हॉलतिकीट जारी करण्यात आले आहेत. हॉल तिकीट इग्नूच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांकडे हॉल तिकीट नसले तरी त्यांची नावे या केंद्रांच्या परीक्षार्थी अथवा उपस्थिती पत्रकांच्या यादीत असली तरी विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देण्याची सूचना परीक्षा केंद्रांना देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांकडे परीक्षेदरम्यान विद्यापीठ अथवा शासनाने जारी केलेले वैध फोटो ओळखपत्र असणे आवश्यक आहे. शासनाने जारी केलेल्या कोरोना प्रोटोकॉलचे पालन करण्यासाठी सर्व परीक्षा केंद्र अधीक्षकांना कळविण्यात आले आहे.

# चेन्नई शहर स्वच्छतेचे प्रारुप कल्याण-डोंबिवलीत राबविणार

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची माहिती

**कल्याण : प्रतिनिधी**

देशातील चेन्नई शहर स्वच्छ, सुंदर ठेवणारे कचरा पारुप लवकरच कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत राबवून शहर स्वच्छ, सौंदर्यीकरणाला प्राधान्य देणार आहे, अशी माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ट्विटद्वारे दिली आहे. शहर स्वच्छ ठेवणारा आदर्शवत असा प्रकल्प चेन्नई महापालिकेतर्फे शहरात राबविण्यात येत असल्याबद्दल त्यांनी चेन्नई पालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

तामिळनाडू राज्यातील चेन्नई महापालिकेच्या निमंत्रणावरून कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी चेन्नईच्या शहर स्वच्छ ठेवणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पांची इत्थंभूत माहिती घेतली. चेन्नई शहराच्या विविध भागांना भेटी देऊन तेथील कचरा संकलन, विल्हेवाट यंत्रणा, सयंत्रांची माहिती त्यांनी घेतली. कचरा विल्हेवाटीचे हे व्यवस्थापन पाहून त्यांनी चेन्नई पालिका देशातील कचरा विल्हेवाट लावणारी आदर्शवत महापालिका असल्याचे मत व्यक्त केले. चेन्नई महापालिका हद्दीत कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणाऱ्या आणि राबविणाऱ्या यंत्रणा, घनकचरा अधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला.

शहरातील दैनंदिन कचरा जमा करणे आणि त्याची त्याच दिवशी विल्हेवाट लावणे याकडे आमचा कटाक्ष असतो, अशी माहिती अधीक्षक अभियंत्यांनी खासदार शिंदे यांना दिली.

## मतदार ओळखपत्र होणार आधारशी लिंक; १ ऑगस्टपासून प्रक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

आता राज्यात मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने याबाबतची तारीखही जाहीर केली आहे. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी सांगितले की, ही प्रक्रिया १ ऑगस्टपासून राज्यभर सुरू होईल.

मतदारांची ओळख पटवून देण्यासाठी आणि मतदार यादीतील नोंदी प्रमाणित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येत असल्याचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक केल्यास एकाच व्यक्तीचे नाव एकापेक्षा जास्त मतदारसंघात किंवा एकाच मतदारसंघात एकापेक्षा जास्त वेळा नोंदणी केल्यास ते शोधून काढणे सोपे होणार आहे. भारत निवडणूक आयोग १ ऑगस्टपासून संपूर्ण राज्यात मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक करण्याची मोहीम सुरू करणार आहे.

इलेक्ट्रॉनिक इलेक्टोरल फोटो आयडेंटिटी कार्ड डेटाशी आधार डेटा लिंक केल्याने मतदारांचा खासगी आणि वैयक्तिक डेटा वैधानिक प्राधिकरणाला उपलब्ध होईल आणि मतदारांवर मर्यादा लागू होईल. म्हणजेच, मतदारांना आता त्यांचे संबंधित आधार तपशील सादर करून निवडणूक नोंदणी अधिकारी (प्रतिसाद क्रमांक २) यांच्यासमोर त्यांची ओळख प्रस्थापित करावी लागेल.

## पिस्तूल विक्रीप्रकरणी तरुणाला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

बेकायदा देशी बनावटीचे पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या मध्य प्रदेशातील तरुणाला गुन्हे शाखेने पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीची तीन पिस्तुले आणि काडतुसे जप्त करण्यात आली.

करवेंद्रसिंग राघवेंद्रसिंग चव्हाण (वय २६, सध्या रा. बेल्हेकर वस्ती, मांजरी) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे पथक केसनंद-थेऊर रस्त्यावर गस्त घालत होते. त्या वेळी एक जण पिस्तूल घेऊन तेथे येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी कानिफनाथ कारखेले यांना मिळाली. पोलिसांनी सापळा लावून चव्हाणला पकडले. त्याच्याकडे एक पिस्तूल आणि काडतुस सापडले. चौकशीत त्याने पिस्तुल विक्रीसाठी आणल्याची कबुली पोलिसांना दिली.

## दुखवटा

### संगीता शिंदे

**कर्जत :** कर्जत एसटी आगारातील वाहक कृष्णा शिंदे यांच्या पत्नी संगीता शिंदे यांचे शुक्रवारी (दि. २२) निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शिंदे परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. ३१) वैजनाथ येथे होणार असून उत्तरकार्य दि. ३ ऑगस्ट रोजी मुद्रे खुर्द येथे होणार असल्याची माहिती शिंदे परिवाराकडून देण्यात आली आहे.



**उरण नगरपरिषद, उरण**
**ता. उरण, जिल्हा-रायगड, पिन कोड-४०० ७०२**

दूरध्वनी क्रमांक : २७२२२३२० Email ID : uranmunicipal@gmail.com

जा.क्र. : उनप/सा.प्र./वि./आरक्षण सोडत/१६१९/२०२२-२०२३ दिनांक : २५/०७/२०२२

**जाहीर नोटीस**

**मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र. ०२/का. ६, दि. २२ जुलै २०२२** अन्वये राज्यातील ११५ नगरपरिषदा व ९ नगरपंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण व सोडतीचा सुधारीत कार्यक्रम २०२२ जाहिर करण्यात आला आहे.

सदर आदेशानुसार राज्यातील एकूण ११५ नगरपरिषदा व ९ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला यांच्या करीता आरक्षित जागा निश्चीत करण्याकरिता परिशिष्ट-१ नुसार आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे देण्यात आला आहे.

तसेच सदर आदेशाद्वारे अनुसूचित जाती, अनसचित जमाती व त्यामधील महिलांसाठी यापूर्वी निश्चीत केलेल्या आरक्षणात कोणताही बदल होणार नाही. मात्र सर्वसाधारण महिलांचे सोडतीद्वारे काढलेले आरक्षण रद्द करण्यात आले आहे.

| अ.क्र | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरू करण्याचा/ संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरीता नोटीस प्रसिध्द करणे (जिल्हाधिकारी व नगरपरिषदेच्या वेबसाईटसह) | जिल्हाधिकारी | दि. २६/०७/२०२२ (मंगळवार) |
| २ | नगरपरिषदांच्या/नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) | मुख्याधिकारी | दि. २८/०७/२०२२ (गुरूवार) |
| ३ | आरक्षणाची अधिसुचना (कलम १० नुसार) रहिवाशांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सुचना मागविणेकरीता वृत्तपत्रात तसेच स्थानिक पातळीवर व जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या/नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | दि. २९/०७/२०२२ (शुक्रवार) |
| ४ | आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सुचना मागविण्याचा कालावधी | जिल्हाधिकारी | दि. २९/०७/२०२२ (शुक्रवार) ते ०१/०८/२०२२ (सोमवार) पर्यंत |
| ५ | आरक्षण व सोडतीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे पाठविणे | जिल्हाधिकारी | दि. ०२/०८/२०२२ (मंगळवार) |
| ६ | नगरपरिषदेच्या/नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या आरक्षणास मान्यता देणे | संबंधित विभागीय आयुक्त | दि. ०४/०८/२०२२ (गुरुवार) पर्यंत |
| ७ | सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसुचना कलम १० नुसार) रहिवाशांच्या माहितीसाठी वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या/नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | दि. ०५/०८/२०२२ (शुक्रवार)पर्यंत |

त्या अनुषंगाने रायगड जिल्हयातील **उरण नगरपरिषदेची** सुधारीत आरक्षण सोडतीकरीता तसेच आरक्षण व सोडतीवरील प्राप्त होणाऱ्या हरकती व सुचना स्विकारणेकामी खालील प्रमाणे ठिकाण व वेळ निश्चीत करणेत येत आहे.

| क्र. | नगरपरिषदेचे नाव | आरक्षण सोडतीची कार्यवाही करणाऱ्या तसेच आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सुचना स्विकारणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम | आरक्षण व सोडतीचा दिनांक व वेळ | आरक्षण सोडतीचे तसेच आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सुचना स्विकारण्याचे ठिकाण | आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सुचना मागविणेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | उरण | मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद | दि. २८/०७/२०२२ (गुरूवार) सायं. ४.०० पासून | उरण नगरपरिषद कार्यालय, ता. उरण, जि. रायगड | दि. २९/०७/२०२२ (शुक्रवार) ते ०१/०८/२०२२ (सोमवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० |

ठिकाण - रायगड ,अलिबाग
दिनांक -२५/०७/२०२२

**सही/-**
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग**

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | Palacio Ventures, रुम नं.१७, पहिला मजला, सहकार बिल्डींग, स्टेशन रोड, कुर्ला (वेस्ट), मुंबई ४०० ०७०. | ०२ आंब्याचे झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.६२ सी. सेक्टर ३०, खारघर येथे भुखंडाच्या मुख्य गेट समोर एक झाड असुन भुखंडामध्ये वाहने ये-जा करण्यास अडथळा करीत असल्यामुळे तोडण्याची परवानगी द्यावी. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावेत. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र. ६१/४९०/२०२२
दिनांक :२५/०७/२०२२

**सही/**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**





**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. २६ जुलै २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ तुर्भे ■ घोट रा.जी.प शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी ■ वळवळी अंगणवाडी ■ पापडीचा पाडा/तळोजा गाव ■ जुई गाव ■ इनामपुरी/पिसार्वे

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### अवैधरित्या दारू विकणाऱ्यावर कारवाई

**पनवेल :** बामणडोंगरी परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्याला एनआरआय पोलिसांनी अटक केली आहे. राजकुमार यादव (रा. बामणडोंगरी) हा बामणडोंगरी परिसरात दारू विक्री करीत असल्याची महिती पोलिसांना मिळताच त्यांच्या पथकाने तेथे छापा टाकून त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

### सुजित सोनावणे तालुका उपाध्यक्षपदी



**पनवेल :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल तालुका उपाध्यक्षपदी सुजित सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनसे जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या हस्ते सुजित सोनावणे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी मनसे रायगड जिल्हा सचिव केसरीनाथ पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण दळवी, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप कांबळे, पनवेल तालुका अध्यक्ष रामदास पाटील यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### वाढदिवसानिमित्त वृक्षवाटपाचा उपक्रम

**पनवेल :** सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर त्यांच्या वाढदिवशी मित्र परिवाराकडून पुष्पगुच्छ किंवा इतर वस्तुरूपी भेटी घेण्यापेक्षा वृक्षरुपी भेट घेऊन त्यात स्वखर्चानेही काही झाडे खरेदी करून आपल्या वाढदिवशी वाटप करण्याचा उपक्रम चालवीत आहेत. आत्तापर्यंत पनवेल तालुक्यातील कल्हे, खैराटवाडी, बारापाडा, बानुबाई वाडी, भोकरवाडी, आणि पेण तालुक्यातील खारपाडा, दर्गावाडी येथील १२५० शेतकरी बांधवांना विविध फळझाडांचे वाटप केले असून यातील अनेक झाडे आता उत्पन्न देत आहेत. सोमवारी (दि. २५) संतोष ठाकूर यांनी वाढदिवशी कोरलवाडीतील ज्या आदिवासी बांधवांना वन हक्क कायद्यानुसार जमिनीचे पट्टे मिळालेले आहेत अशा बारा आदिवासी शेतकऱ्यांना १५० झाडे देऊन आपला वाढदिवस साजरा केला. या वेळी कल्हे वन परिमंडळाचे वनपाल हेमंत कारंडे, वनरक्षक आप्पासाहेब घोंगडे ग्राम संवर्धनचे तेजस चव्हाण आणि आदिवासी शेतकरी उपस्थित होते.



# ९६ दिवसांत उभारल्या ९६ सदनिका

## सिडकोने बांधकाम क्षेत्रात रचला नवा इतिहास

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाने उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली, जगप्रसिद्ध प्रीकास्ट या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून बामणडोंगरी रेल्वेस्थानकाजवळ ९६ सदनिका असणाऱ्या १२ मजली निवासी इमारतीचे बांधकाम केवळ ९६ दिवसांत पूर्ण केले आहे. याद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्वांसाठी घरे हे उद्दिष्ट जलद गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने सिडकोने गृहनिर्माण क्षेत्रात इतिहास रचला आहे.

सिडकोतर्फे 'परिवहन केंद्रीत विकास' संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महागृहनिर्माण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटांसाठी सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.



सिडकोने 'मिशन ९६' अंतर्गत कमीत कमी वेळात बांधकाम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठरवले होते. त्यानुसार कंत्राटदार मे. लार्सन न्ड टुब्रो यांनी बांधकाम वेगाने पूर्ण करण्यासह सुरक्षित आणि मजबूत घरे बांधण्याकरिता प्रीकास्ट तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. प्रीकास्ट तंत्रज्ञानाचा वापर करून, ९६ सदनिका असणाऱ्या १२ मजली निवासी इमारतीचे बांधकाम केवळ ९६ दिवसांत पूर्ण करण्यात आले आहे. ४ एप्रिल २०२२ रोजी सुरू झालेले १२ मजली इमारतीचे बांधकाम ९ जुलै २०२२ रोजी पूर्ण करण्यात आले असून यामुळे रेरा कायद्यातील वेळेत बांधकाम पूर्ण करण्याच्या मानकाचेही अनुपालन करण्यात आले आहे.

प्रीकास्ट तंत्रज्ञान हे भविष्यात सर्वोत्तम गुणवत्तेसह नियंत्रित वातावरणात यांत्रिक पद्धतीने निवासी इमारतींचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते. या बांधकामामध्ये वास्तुशास्त्रीयदृष्ट्या परिपूर्ण (फिनिशिंग) करण्यासह अधिसंरचनेच्या (सुपरस्ट्रक्चर) १,९८५ प्रीकास्ट घटकांचे उत्पादन (प्रॉडक्शन) आणि प्रतिष्ठापन (इन्स्टॉलेशन) करणे आणि ६४,००० चौ. फुट बांधीव क्षेत्रावर यांत्रिक, विद्युत, नळकाम विषयक कामे (एमईपी) करण्याचा समावेश होता. बांधकाम तंत्रज्ञानाव्यतिरिक्त बांधकामाच्या प्रगतीवर देखरेख करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला आहे.

### हजारो कुटुंबांच्या स्वप्नपूर्तीकडे पाऊल

**मिशन ९६च्या निमित्ताने नियंत्रित वातावरणात, मजला बांधणीचा कालावधी कमी करण्यासह कमी मनुष्यबळाच्या उपलब्धतेसह उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यासाठी प्रीकास्ट तंत्रज्ञान किती सक्षम आहे हे सिद्ध झाले आहे. या यशासह सिडकोने नवी मुंबईमध्ये हक्काचे घर घेऊ इच्छिणाऱ्या हजारो कुटुबांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे घरांची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित झाली आहे.**

## 'पावसाळ्यातील कीटकजन्य रोग टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी'

**पनवेल : प्रतिनिधी**

पावसाळ्यात विविध प्रकारचे कीटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे, असे पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले आहे.

साथरोग टाळण्यासाठी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहीरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षारसंजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी फुलदाणी, मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादी ठिकाणचे पाणी आठवड्यातून एकदा बदलावे, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

हगवण किंवा अतिसार, कावीळ असे आजार टाळण्यासाठी पाणी उकळून पिणे, जेवणापूर्वी, शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, उघडे अन्नपदार्थ खावू नये. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालयाशी संपर्क साधावा.

हिवताप, डेंगू, चिकनगुनिया असे साथीचे रुग्ण आसपास आढल्यास जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रुग्णालयाशी संपर्क साधावा. रुग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रुग्ण महापालिकेला panvelmoh@gmail.com या ईमेलआयडीवरती कळवावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुलीच्या अपहरणकर्त्याला बेड्या

**पनवेल : वार्ताहर**

एका १४ वर्ष ११ महिन्यांच्या मुलीस फूस लावून अपहरण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने सखोल तपास करून मालेगाव येथून अटक केली आहे.



तालुक्यातील खैरणे गाव येथून एका अज्ञात व्यक्तीने अल्पवयीन मुलीला फूस लावून अपहरण केल्याबाबतच्यसा आशयाची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांच्या पथकाने पनवेल, तळोजा परिसरातील सी. सी. टी. व्ही. फुटेज चेक करून आरोपी निष्पन करण्यास सुरुवात केली. तांत्रिक तपास व गुप्तबातमीदरांच्या माहितीनुसार आरोपी रत्नागिरी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथक तेथे पोहचले असता आरोपी मालेगावला पळाला. आरोपी हा बीफ फिशरी प्रोसेसिंग कंपनीत पहिल्यापासून काम करीत असल्याने तो मालेगाव येथील बिफच्या कंपनीत काम करत असावा असा कयास करून मालेगावमधील सर्व बिफ कंपन्या चेक केले असता आरोपी हा फायर इम्पोर्ट आणि एक्स्पोर्ट कंपनी येथे कामाला असल्याची माहिती मिळाली.

मालेगाव येथे जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने पाहिजे आरोपी बबुल दिलाई स्वरग्रही (वय २२, रा. सिपोरिया, पोस्ट.तेलिगाव, आसाम) यास कंपनीच्या लेबर कॉलनीमधून ताब्यात घेऊन अपहरीत मुलीची यशस्वीरित्या सुखरुपपणे सुटका केली व आरोपीस अटक करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

## 'वडाळे'तील पाण्याचा दर्जा राहणार चांगला

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या विविध वास्तूंमध्ये वडाळे तलाव सर्वांत महत्त्वाचा आहे. या तलावातील पाण्याचा दर्जा चांगला राहावा म्हणून नैसर्गिक पध्दतीने प्रक्रिया करण्यास महापालिकेने सुरूवात केली आहे.

पनवेल शहरांची ओळख निर्माण झालेल्या वडाळे तलावातील पाण्याची गुणवत्ता जलपर्णी तसेच इतर पाणवनस्पतीमुळे कमी होऊ लागली होती. जलपर्णी वाढल्यामुळे सुर्यप्रकाश पाण्यापर्यंत पोहचत नाही. तसेच पाण्यातील ऑक्सीजनची पातळी कमी होते. त्यामुळे तलावातील पाणी दूषित होऊन गुणवत्ता कमी होते. महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर व आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार वडाळा तलावातील पाण्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी बायो रिमेडिएशन अॅण्ड मेकॅनिकल पध्दतीने प्रक्रिया करून प्रदूषित झालेल्या पाण्याचा दर्जा सुधारण्यात येणार आहे.

तलावामध्ये वाढलेली अनावश्यक जलपर्णी मशीन तसेच कामगारांच्या सहाय्याने काढली जात आहे. वडाळे तलावातील पाण्याचा दर्जा चांगला राहावा म्हणून नैसर्गिक पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी २९ जून रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकित सदस्यांनी मंजूरी दिली होती. त्यानूसार या कामास सुरूवात करण्यात आली आहे.



## जि.प., पं.स. सार्वत्रिक निवडणूक आरक्षण सोडत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका - २०२२ आरक्षण सोडत आयोजित करण्याचे तहसीलदार यांनी निर्देश दिले आहेत.

जिल्हा परिषद आरक्षणाबाबत सोडत गुरुवारी (दि. २८) दुपारी ३ वाजता जिल्हा स्तरावर नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग व पनवेल पंचायत समिती आरक्षणाबाबत आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे गुरुवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. पंचायत समिती आरक्षणकरीता उपस्थित रहावे, असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे.

## फरारी महिलेला खारघरमधून अटक

**पनवेल : वार्ताहर**

पुण्यातील फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका पेढीतून अडीच कोटी रुपये किमतीची पाच किलो सोन्याची बिस्कीटे लांबविणाऱ्या महिलेला फरासखाना पोलिसांनी खारघरमधून नुकतीच अटक केली आहे. माधवी चव्हाण असे अटक केलेल्या आरोपी महिलेचे नाव असून ती खारघरमधील रहिवासी आहे.

पोपटलाल गोल्ड पेढीचे मालक राकेश सोलंकी यांची रविवार पेठेत पेढी आहे. सोलंकी यांच्या पेढीत ही महिला नेहमी सोने खरेदीसाठी यायची. काही दिवसांपूर्वी चव्हाण सोलंकी यांच्या पेढीत सोने खरेदीसाठी आली होती व तिने पाच किलो सोन्याची बिस्किटे खरेदी केली. रोकड बँक खात्यात जमा करते, असे तिने सोलंकी यांना सांगितले व पेढीसमोर लावलेल्या मोटारीत बिस्किटे ठेवून येते, असे सांगून सोलंकी यांना पैसे देता ती पसार झाली होती. यानंतर सोलंकी यांनी फरासखाना पोलिसांकडे तक्रार नोंदविली होती. पोलिसांना ही महिला खारघर परिसरात असल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी थेट खारघरमध्ये येऊन तिला या गुन्ह्यात बेड्या ठोकल्या. न्यायालयाने आरोपी महिलेस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



**पनवेल : खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजच्या एलएलबी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी रविवारी निसर्ग संगोपन हा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत झाडे लावा झाडे जगवा ही संकल्पना जागवत नेरे येथे वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता सुहास भगत, तसेच प्रिया फंडागले, विजय मोरे, स्वप्निल मुंडकले, सचिन सोनावने, प्रणाली ठाकूर, गजानन पाटील (नेरे), मीनल सदावर्ते आदी उपस्थित होते.**

## सीकेटी महाविद्यालयातर्फे दुंदरे येथे वृक्षारोपण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेंज फॉरेस्ट्री ऑफिसर, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २१) ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे येथे वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी ग्रुप ग्रामपंचायत दुंदरेचे सदस्य, पदाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती लाभली.

आझादी का अमृत महोत्सवनिमित्त महाविद्यालयात बहुविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून. याच शृंखलेत एक स्वयंसेवक एक झाड या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमदिनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तथा कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या चमुने दुपारी १२ वाजता उपक्रमस्थळाकरीता महाविद्यालयातुन प्रस्थान केले. या चमूचे ग्रुप ग्रामपंचायत दुंदरेचे सदस्य आणि कर्मचाऱ्यामार्फत स्वागत करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी सरपंच अनुराधा विष्णु वाघमारे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपूर्वा ढगे यांनी उपसरपंच निराबाई शांताराम चौधरी यांचा सत्कार केला. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच उपस्थित विद्यार्थी, स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या फळे व फुलांच्या एकूण २५० रोपांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

या वेळी ग्रामपंचायतीचे सदस्य विष्णु वाघमारे, रमेश पाटील, किशोर पाटील, दर्शना चौधरी, मंगळा उसाटकर, दीपक उलवेकर, भारत भोपी, विजयकुमार राठोड (ग्रामसेवक), मोहन पाटील (ग्रामसेवक) यांचे विशेष सहकार्य लाभले.

वृक्षारोपण मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपूर्वा ढगे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका रुपाली आगलावे यांनी विशेष परिश्रम घेतले.

वृक्षारोपण मोहिमेच्या आयोजनाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. निफ्टी प्राईव्हेट बँक निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या बँकेचा समावेश होत नाही?**
- ***अ.*** कोटक महिंद्र बँक
- ***आ.*** अक्सेस बँक
- ***इ.*** आयडीएफसीफस्ट बँक
- ***ई.*** युको बँक

**२. निफ्टी आयटी निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा समावेश होत नाही?**
- ***अ.*** एल अँड टी इन्फोटेक
- ***आ.*** माइंडट्री
- ***इ.*** आयटीसी
- ***ई.*** विप्रो

**३. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचे बाजारमूल्य सात लाख कोटींच्या वर नाही? (जुलै २०२२)**
- ***अ.*** रिलायन्स इंडस्ट्रीज
- ***आ.*** एलआयसी
- ***इ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस
- ***ई.*** एचडीएफसी बँक

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# इतिहास घडताना

यंदा आपला देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहे. या अमृत महोत्सवी वर्षात आदिवासी पाड्यातून आलेली एक कर्तृत्ववान महिला देशाच्या सर्वोच्च स्थानापर्यंत येऊन पोहोचते, तो क्षण निश्चितच ऐतिहासिक मानायला हवा. समाजातील शेवटच्या स्तरावरील शेवटच्या व्यक्तीपर्यंत उन्नतीचा स्पर्श होणे हेच लोकशाहीला अपेक्षित असते.

**भारताच्या १५व्या राष्ट्रपती म्हणून श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी सकाळी धीरगंभीर समारंभात शपथ घेतली. भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील हा निश्चितच एक अत्यंत महत्त्वपूर्ण क्षण होता. संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये हा शपथविधी सोहळा पार पडला. भारताचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी श्रीमती मुर्मू यांना शपथ देवविली, तेव्हा मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्यासह उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, पंतप्रधान नरेंद्र मोदी असे अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. दर पाच वर्षांनी राष्ट्रपती पदाचा कार्यकाल संपतो व नवा राष्ट्रपती निवडला जातो. त्यात नवे असे काही नाही. या आधी स्वतंत्र भारतात चौदा वेळा अशी नियुक्ती झालीच आहे. मग राष्ट्रपती पदी श्रीमती मुर्मू या विराजमान झाल्या यात ऐतिहासिक असे काय घडले असा प्रश्न कुणीही विचारेल. परंतु भारतीय लोकशाहीचा इतिहास पाहता या घटनेचे महत्त्व कळून येते. १९४७ साली इंग्रजांनी गाशा गुंडाळला आणि भारतीय प्रजासत्ताक देशातील नेत्यांच्या स्वाधीन केले. स्वातंत्र्य संग्रामात अनेकांनी बलिदान दिले, हौतात्म्य पत्करले. भारताला मिळालेले स्वातंत्र्य सुखासुखी पदरात पडलेले नाही. त्याची जबर किंमत भारतीय जनतेने मोजली आहे. देश उभारणीसाठी सर्व जण पक्षभेद विसरून कामाला लागले, तेव्हा कुठे भाक्रा–नांगलसारखे विशाल धरण किंवा आयआयटीसारखी संस्था आणि विद्यापीठांची उभारणी होऊ शकली. श्रीमती द्रौपदी मुर्मू या संथाली नावाच्या आदिवासी जमातीतून येतात. अतिशय विवंचनांनी भरलेले असे त्यांचे बालपण होते. दुर्गम आणि अशिक्षित भागातून आलेल्या श्रीमती मुर्मू यांनी मोठ्या जिद्दीने स्वत:चे शिक्षण पूर्ण केले. त्या काळात ओडिशामध्ये भारतीय जनता पक्षाला नगण्य स्थान होते. त्या काळापासून निष्ठेने त्यांनी समाजाची सेवा सुरू ठेवली. राजकीय कारकीर्दीला बहर येत असतानाच दोन तरुण मुले आणि पती त्यांनी गमावला. कुटुंबाची वाताहत झाली तरी समाजसेवेचे व्रत त्यांनी सोडले नाही. झारखंडच्या राज्यपाल असताना आदिवासी समाजाचे भले व्हावे या हेतूने त्यांनी काही ठराव रोखून धरले आणि काही प्रमाणात पक्षश्रेष्ठींची नाराजी देखील ओढवून घेतली. स्वत:चे म्हणणे वरिष्ठांना पटवून देण्यात त्या यशस्वी झाल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे यश निश्चितच डोळ्यात भरण्याजोगे आहे. अर्थात, राष्ट्रपतीपदी स्थानापन्न होणे हे त्यांचे व्यक्तिगत यश जसे आहे, तसेच ते एकसंध समाज म्हणून आपल्या सर्वांचे आहे. एक आदिवासी स्त्री अत्युच्च स्थानी पोहोचेल याची हमी फक्त लोकशाही व्यवस्थेतच मिळू शकते. शपथविधी सोहळ्यानंतर राष्ट्राला संबोधित करताना नवनिर्वाचित राष्ट्रपती म्हणाल्या की जंगल आणि जलाशय या दोन्ही घटकांना मी फार जवळून पाहिले आहे. आसपासचे पर्यावरण सांभाळत देशाला विकासाच्या मार्गावर नेण्याच्या दृष्टीने मी सदैव प्रयत्नशील राहीन. राष्ट्रपतीपदी बसणे हे माझे वैयक्तिक यश नव्हे. त्या पदावर माझ्यासारखीने बसणे हे लोकशाहीचेच प्रतीक आहे. महामहीम द्रौपदी मुर्मू यांचे हे उद्गार सदैव लक्षात राहतील.**

# खारेपाटातील खारबंदिस्तींची कामे पूर्ण व्हावीत

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

गेले कित्येक वर्षे अलिबाग तालुक्यातील खारेपाट भागातील खारबंदिस्तींची कामे न केल्यामुळे समुद्राचे खारेपाणी घुसून हजारो एकर जमीन नापीक झाली आहे. समुद्राला उधाण आले की, खारेपाटात पाणी शेतात घूसते. उधानाचे पाणी शेतातून आता लोकवस्तीपर्यंत येऊ लागले आहे. हे असेच सुरू राहिले तर अलिबाग तालुक्यातील खारेपाट पाण्याखाली जाण्याची भीती आहे. या भागातील काही खारबंदिस्तींच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. परंतु तांत्रिक अडचणींमुळे काम सुरु झालेली नाहीत. याबाबत शासनाने ताडीने निर्णय घेऊन खारबंदिस्तीची कामे करायला हवीत.



खारेपाट भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. खारबंदिस्ती फुटून सतत खारेपाणी भातशेतीत शिरते. या पाण्यामुळे खारेपाटातील शेती उद्ध्वस्त होत आहे. रेवस, हाशिवरे, कावाडे, सोमकोठा, रामकोठा, मल्हार कोठा, नारंगीखार, मानकोळेखार, शिरवली, चिंचवली परिसरातील सुपिक जमिनी, मोऱ्या खाऱ्या पाण्याने प्रभावित झाल्या आहेत. आजमितीला फार थोडेच शेतकरी आपली शेती वाचवून आहेत. भातशेती पिकविण्यासाठी होणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळ बसत नाही. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. बांधबंदिस्तींची येथे दयनीय अवस्था झालेली आहे.

पावसाळ्यात, तसेच अमवास्या, पौर्णिमा या काळात उधाणाचा मारा मोठ्या प्रमाणात होतो. उधाणाचे पाणी आता लोकवस्तीपर्यत पोहचू लागले आहे. गावांमध्ये पाणी शिरते, परिणामी शेतकऱ्यांना भात शेतीबरोबर आपली घरेदारेही वाचविण्यासाठी कसरत करावी लागते. मागील आठवड्यात आलेल्या उधाणामुळे धेरंडमध्ये लोकांच्या घरात उधाणाचे पाणी घुसले. लोकांचे नुकसान झाले. मागील काही महिन्यांमध्ये या परिसरात उधाणाचे पाणी धुसले होते. उधाणाच्या पाण्याने शेती नापिक झाली. आता आपले घरदेखील जाण्याच्या भितीने या खारेपाटातील शेतकऱ्यांची झोप उडाली आहे.




या भागातील शेतकरी केवळ भातशेतीवर अवलंबून नाही तर अनेकांच्या बागायती आहेत, परंतु त्यावरही खाऱ्या पाण्याचा दुष्परीणाम जाणवत आहे. खारेपाटातील बांधबंदीस्तींचा प्रश्न गांभिर्याने घेतला नाही तर भविष्यात खारेपाट उद्ध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अलिबाग तालुक्यामधील काही खारबस्तींच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. परंतु तांत्रिक अडचणींमुळे कामाला सुरूवात झालेली नाही, हा मोठा प्रश्न आहे. अलिबाग तालुक्यामध्ये एकूण ३५ खारबंदीस्ती आहेत. त्यापैकी शहापूर, चरी–कोपर, रामराज, भिजलीबोरघर, वासखार, हाशिवरे खारबंदिस्ती खासगी आहेत. काही खारबंदीस्ती जुन्या आहेत. त्या फुटण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी डागडूजी केली आहे. या खारबंदीस्ती फुटून उधाणाचे पाणी शेत जमिनींमध्ये घुसून शेतकऱ्यांचे नुकसान होते. काही ठिकाणी शेतकरी आपल्या पध्दतीने खारबंदीस्ती दुरूस्ती करतात. परंतु या मोठ्या खारबंदीस्ती असल्यामुळे त्यांच्या दुरूस्तीचा खर्च शेतकऱ्यांना परवडणार नाही. त्यांची दुरूस्ती करायला हवी. अलिबाग तालुक्यातील खारबंदीस्ती फुटत असतात. शेतकरी त्यांना जमेल तसे त्या दुरूस्त करत असतात.

मानकुळे, कावाडे, शहापूर, बहिरीचापाडा येथील खारबंदीस्ती फुटून उधाणाचे पाणी शेत जमिनीमध्ये घुसत असते. धेरेंड–शहापूर परिसरातील काही शेतकऱ्यांनी १२ वर्षापूर्वी विद्युत प्रकल्पासाठी आपल्या जमीन विकल्या होत्या. त्या जमिनी एमआयडीसीकडे वर्ग झाल्या. त्यामुळे येथील खारबंदिस्तींची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

खारबंदिस्तींची दुरुस्ती न केल्यामुळे धेरंड, मोठे शहापूर, धाकटे शहापूर या तिन्ही गावांना समुद्राच्या भरतीचा पाणी घुसल्याने ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जर हीच परिस्थिती राहिली तर गावात उधाणाचे पाणी यापुढेही शिरत राहणार. खारबंदिस्ती फुटण्याची अनेक कारणे आहेत. या बंदिस्ती फार वर्षांपूर्वी बांधलेल्या आहेत. त्यामुळे त्या फुटतात. त्याचबरोबर समुद्रात व खाड्यांमध्ये होत असलेल्या भरावांमुळे पाण्याची पातळी वाढते. पाण्याच्या प्रवाहामुळे खारबंदीस्ती फुटते. खेकड्यांनी खोदलेल्या बिळांमध्ये पाणी घुसल्यामुळे खारबंदीस्ती फुटते. पुढील धोका विचारात घेऊन राज्य शासनाने खारबंदीस्तीची कामे केली पाहिजेत. जिथे आवश्यक आहे तिथे नवीन बांधबंदिस्ती केली पाहिजे. ज्या ठिकाणी बांधबंदिस्तीची दुरूस्ती होण्यासारखी आहे तेथे तातडीने दुरूस्तीची कामे करायला हवीत. त्यामुळे पुढील धोका टाळता येईल. उधाणाचे पाणी घरात घुसून नुकसान झाल्यास किंवा शेतीचे नुकसान झाल्यास नैसर्गिक आपत्ती म्हणून नुकसानभरपाई दिली जात नाही. ती मिळावी अशी येथील शेतकऱ्यांची मागणी आहे. तीचा विचार आता तातडीने व्हायला हवा.



## बदलते तंत्रज्ञान



### असा करा मोबाइल चार्ज

मोबाईलमध्ये, आपल्याला बॅटरीचा त्रास होतो. अनेक लोक तक्रार करतात की, त्यांच्या फोनची बॅटरी लवकर संपते. काही लोक असे म्हणताना दिसतात की, त्यांच्या फोनची बॅटरी लवकर चार्ज होत नाही आणि फोनच्या बॅटरीमध्ये काही समस्या असल्यास, स्पष्ट आहे की, तुमचा मोबाइल तुम्हाला नक्की त्रास देईल. मोबाइलची बॅटरी झपाट्याने खराब होण्यामागे अनेक वेळा उत्पादनातील दोष असले तरी काही वेळा आपण स्वत: त्याला जबाबदार असतो. मोबाइल चार्ज करताना आपण खबरदारी घेत नाही आणि त्याचा त्रास मोबाइलला होतो. कमकुवत बॅटरीमुळे फोनच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत, तुम्हाला बॅटरी चार्जिंगची योग्य पद्धत जाणून घेतली पाहिजे.

स्मार्टफोनमध्ये प्रामुख्याने लिथियम आयन बॅटरी वापरतात. ही बॅटरी पूर्णपणे डिस्चार्ज झाल्यावर तिची क्षमता गमावते. अशा परिस्थितीत, पूर्णपणे डिस्चार्ज न करण्याचा प्रयत्न करा. तसेच १०० टक्के चार्जिंग टाळा. अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टीमचे निर्माते गुगलचे म्हणणे आहे की, जर तुम्हाला तुमच्या फोनच्या बॅटरीचा चांगला परफॉर्मन्स हवा असेल, तर बॅटरी ४० टक्के ते ८० टक्के दरम्यान चार्जिंग ठेवा. तसेच दुसरीकडे बॅटरी चार्जिंग २० टक्क्यांपेक्षा कमी नसावी यासाठीदेखील प्रयत्न करा. फोन पूर्ण चार्ज करण्याऐवजी, आपण ते सुमारे ९० टक्के असताना बंद केल्यास ते अधिक चांगले होईल. चार्जिंग करताना, नेहमी खात्री करा की, चार्जर पोर्टशी योग्यरित्या जोडलेला आहे. जर ते सैल असेल किंवा व्यवस्थित बसत नसेल तर ते वापरू नका. यामुळे एकतर चार्जिंगमध्ये त्रास होईल आणि दुसरा मोबाइलचा चार्जिंग स्लॉटदेखील खराब होऊ शकतो. आजकाल अनेक फोनमध्ये वायरलेस चार्जिंग आहे. पण हे वायरलेस चार्जिंग बॅटरीच्या आरोग्यासाठी फारसे चांगले नाही. वायरलेस चार्जर बॅटरी चार्जिंग क्षेत्रात उष्णता निर्माण करतात. या दरम्यान मोठ्या प्रमाणात ऊर्जादेखील वापरली जाते. ही उष्णता अनावश्यकपणे बॅटरीदेखील गरम करते आणि उष्णतेमुळे मोबाइलचे देखील नुकसान होऊ शकते.

# वारकरी संतकवी नामदेव महाराज

नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संतकवी होते. त्यांचे आडनाव रेळेकर असे होते. ते मराठी भाषांमधील सर्वाधिक जुन्या काळातील कवींपैकी एक होते. भक्तशिरोमणी संत नामदेव हे संत ज्ञानेश्वरांच्या कालखंडातील आहेत. वारकरी संप्रदायाचे प्रचारक नामदेव महाराज नामवेदाचे व नामविद्येचे आद्य प्रणेते असलेले महाराष्ट्रातील हे एक थोर संत होत. आपल्या कीर्तनकलेमुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला डोलायला लावणारी अशी त्यांची किर्ती होती. संत नामदेव प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाच्या निकटवर्ती असलेला सखा होता, असे मानले जाते. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली.



दामाशेट्टी हे संत नामदेवांचे वडील व गोणाई त्यांची माता होती. दामाशेटींचा व्यवसाय कपडे शिवणे हा होता. म्हणजे ते शिंपी होते. यांच्या अगोदरच्या सातव्या पिढीतील पुरुष यदुशेट हे सात्त्विक प्रवृत्तीचे होते. सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी–बामणी (नरसी नामदेव) हे संत नामदेवांचे जन्म गाव होय.

नामदेवांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७०मध्ये झाला. संत नामदेवांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्री विठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली. संत गोराकुंभार यांच्याकडे, तेरढोकी येथे निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर महाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, संत नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर आदी संतांचा मेळा जमला होता. याच प्रसंगी संत ज्ञानेश्वरांच्या विनंतीवरून गोरोबाकाकांनी उपस्थितांच्या आध्यात्मिक तयारीविषयी आपले मतप्रदर्शन केले होते. या प्रसंगानंतरच संत नामदेवांना विसोबा खेचर हे आध्यात्मिक गुरू म्हणून लाभले. पत्नी राजाई, मोठी

**निमित्त**

बहीण आऊबाई, नारा, विठा, गोंदा, महादा हे त्यांचे चार पुत्र व एक मुलगी लिंबाई असा संत नामदेवांचा परिवार होता. त्यांच्या कुटुंबात एकूण पंधरा माणसे होती. स्वतःला 'नामयाची दासी' असे म्हणणाऱ्या संत जनाबाई या त्यांच्या परिवारातील एक सदस्य होत्या. संत नामदेवाची अभंगगाथा प्रसिद्ध आहेत. कीर्तनांत अनेक चांगल्या ग्रंथांचा उल्लेख असे. यावरून ते बहुश्रुत व अभ्यासू असल्याचे लक्षात येते. 'नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग' अशी त्यांची योग्यता होती. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते.

भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५०वर्षे भागवतधर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले. पंजाबमधील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव 'नामदेव बाबा' म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबातील 'शबदकीर्तन' व महाराष्ट्रातील 'वारकरी कीर्तन' यांत विलक्षण साम्य आहे. घुमान (पंजाब) येथे शीख बांधवांनी त्यांचे मंदिर उभारले आहे. बहोरदास, केशव कलाधारी हे त्यांचे पंजाबी शिष्य होतं. राजस्थानातील शीख बांधवांनीही नामदेवाची मंदिरे उभारलेली आहेत. संत शिरोमणी असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते. भगवद्भक्तांच्या व साधु संतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्यात त्यांनी धन्यता मानली.

संत नामदेव हे शनिवारी ३ जुलै, १३५० रोजी पंढरपूर येथे पांडुरंगचरणी विलीन झाले. नक्की दिनांकाविषयी एकवाक्यता दिसून येत नाही. कालनिर्णय या दिनदर्शिकेत पुण्यतिथी दिनांक मात्र वेगळा दिलेला आढळतो. संत नामदेव हे कीर्तने करत करत भारतभर फिरले.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : गणेशोत्सव महिनाभरावर आला असल्याने सगळीकडे आता जय्यत तयारी सुरू झाली आहे. मूळचे उत्तर प्रदेशमधील लखनऊचे ढोलकीवाले पनवेल शहराकडून हळूहळू ग्रामीण भागातही दाखल झाले आहेत.**

## आरोग्य प्रहर

### बहुगुणी अडुळसा

हिरवा आणि लाल अडुळसा असे याचे दोन प्रकार आहेत. साधारण ३०० मिमी पावसाच्या प्रदेशात लाल अडुळसा आढळतो. पानांची चव कडू असते. याचा उपयोग मुख्यत्वे कफ कमी करण्यासाठी होतो. संस्कृतमध्ये याला 'वासा' म्हणून संबोधतात. बाजारात मिळणारे वासा सिरप खोकल्यावर अतिशय गुणकारी असते. अडुळशाच्या पानांचा उपयोग औषधाप्रमाणेच खत म्हणूनही होतो. शिंपी पक्षी याची दोन पाने शिवून घरटे बांधतात. अडुळशाच्या पांढऱ्या फुलांच्या तळाशी मध असतो. त्यामुळे मधमाशांना या झाडाचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो.

श्वास घेण्यास त्रास होत असेल तर अडुळशाच्या रसात मध आणि पिंपळी यांचे चाटण अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे श्वासाचा विकार बरा होण्यास मदत होते. श्वास लागणे कमी होते. तसेच नाकातून अथवा तोंडातून रक्त येत असल्यास अडुळसा उपयुक्त ठरतो.१० मि.लि. अडुळशाचा रस तितकीच खडीसाखर घालून द्यावा, रक्त पडण्याचे कमी होते. अडुळशाच्या पानांचा डोक्यावर लेप घातला असता नाकातून वाहणारे रक्त बंद होते. अडुळसा कफनाशक आहे. अडुळशाच्या पानांच्या विड्या करून त्या ओढल्या असता छातीतील कफ पातळ होऊन दमेकरी मनुष्यास फार सुखावह वाटते. क्षयरोगावर औषध करताना काढ्यात अडुळशाचे एक पान व एक लहान ज्येष्ठमधाचा तुकडा (सुमारे ३ ग्रॅम) घालून पाव लिटर पाणी घालावे व अष्टमांश काढा करून घ्यावा. हा काढा क्षयरोगावर उत्तम समजला जातो. क्षय झाला असता अडुळशाचा अवलेह देतात. अडुळशाची लागवड फांदीपासून करतात. याचे कोवळे शेंडे लवकर रुजतात. लावताना पाने देठापासून कापावीत. जी फांदी लावायची आहे, तिला किमान दोन गाठी असणे आवश्यक आहे. एक गाठ मातीत आणि दुसरी मातीच्या वर राहील, अशा पद्धतीने फांदी लावावी. मातीतील गाठीतून मुळे आणि वरील गाठीतून कोंब फुटतात. हवेत आद्रता असताना म्हणजे जून–जुलैमध्ये छाट कलम जास्त चांगले रुजते.



अळुशाला आयुर्वेदामध्ये बरेच महत्त्व आहे. पूर्वीच्या काळी तर आजारी कोण पडल्यास घराघरामध्ये याचा वापर केला जात असे. प्रत्येकाच्या परसबागेत हे झाड असायचे. अडुळशापासून बनविलेले औषध बाजारात पाहायला मिळते. दरम्यान, देण्यात आलेली ही माहिती सामान्य ज्ञानावर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या त्या–त्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच याचा वापर करावा.

# पोलादपुरातील वडाचा कोंड ग्रामस्थांचे स्थलांतर

## ▌भूस्खलनाच्या धोक्यामुळे प्रशासनाकडून सतर्कता

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चरई ग्रामपंचायत हद्दीतील वडाचा कोंड गावालगतच्या डोंगराला पडलेल्या भेगांची पाहणी केल्यानंतर प्रशासनाने शनिवारी ग्रामस्थांना तातडीने स्थलांतरित होण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र आषाढातील कामिका एकादशीच्या पार्श्वभूमीवर स्थलांतरित होण्यासाठी पोलादपूरचे निवासी नायब तहसीलदार समीर देसाई आणि पोलीस कर्मचाऱ्यांना ग्रामस्थांच्या मिन्नतवाऱ्या कराव्या लागल्या. त्यानंतर रविवारी (दि. २४)ग्रामस्थ सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित झाले.


(छाया : शैलेश पालकर)

वडाचा कोंड गावातील शेतकरी सतीश बांदल शनिवारी सकाळी बकऱ्या आणि गुरांना चरण्यासाठी डोंगरावर घेऊन गेले असता त्यांना तेथे भेगा पडल्याचे आढळले. ही बातमी त्यांनी चरई ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुशांत कदम आणि पोलादपूर तहसील कार्यालयाच्या आपत्ती निवारण कक्षाला कळविली. त्यानंतर महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, पोलादपूर तहसीलदार दिप्ती देसाई, तलाठी सुनील वैराळे यांनी तातडीने एनडीआरएफच्या जवानासह घटनास्थळाची पाहणी करून तात्काळ चरई वडाचाकोंड येथील ज्ञानेश्वरवाडी व हनुमानवाडी ग्रामस्थांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याच्या सूचना दिल्या.

प्रशासनाने त्यासाठी ग्रामस्थांची बैठक बोलावली होती. त्यात आषाढातील कामिका एकादशीचे भजन, किर्तन झाल्यानंतर आणि उपवास सोडल्यानंतर घरातून बाहेर पडण्याची तयारी ग्रामस्थांनी दर्शविली. ग्रामस्थांना डोंगराला पडलेल्या भेगांपेक्षा एकादशीव्रताचे माहात्म्य अधिक असल्याचे दिसून आल्याने पोलादपूरचे निवासी नायब तहसीलदार समीर देसाई आणि पोलादपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी एपीआय आंधळे तसेच महाड कन्ट्रोलचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पवार आणि पोलीस कर्मचाऱ्यांना चक्क ग्रामस्थांच्या मिन्नतवाऱ्या कराव्या लागल्या. त्यानंतर सुमारे दीडशेपैकी ७५ ग्रामस्थांना रानवडीच्या मंदिरामध्ये स्थलांतरीत करण्यात आले आणि सुमारे ६७ ग्रामस्थांनी आपल्या नातेवाईकांकडे आश्रय घेतला. या वेळी प्रशासनाकडून रानवडीच्या मंदिरात ग्रामस्थांना साबुदाण्याची खिचडी तसेच शाकाहारी जेवण देण्यात आले. मात्र, रात्री सर्वांनाच मच्छरांनी हैराण केल्याने सोमवारची सकाळ उजाडताच सर्वजण आपआपल्या घराकडे तातडीने परतले.

## महिलेचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी; आरोपीला अटक

**माणगाव : प्रतिनिधी**

कॉफीमध्ये गुंगीचे औषध देऊन काढलेले अश्लील फोटो सोशल मीडियावर व नातेवाईकांना पाठविण्याची धमकी देऊन एका महिलेला मानसिक त्रास दिल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

या घटनेतील आरोपी अनंत बासू मातारी (वय ३७, रा. वळे-भागाड, ता. माणगाव, मूळ रा. आसाम) याने फिर्यादी पीडित महिलेस कॉफीमध्ये गुंगीचे औषध देऊन तिचे अश्लील फोटो काढले. अनंत त्याने ते फोटो त्याच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावरून पीडित महिलेला पाठवून ते फोटो सोशल मीडियावर व नातेवाईकांना पाठवेन, अशी धमकी देऊन फिर्यादी महिलेकडून एकूण सहा लाख ७० हजार रुपये काढून घेतले तसेच फिर्यादी महिलेच्या अल्पवयीन मुलीशी संबंध ठेवण्याचे वारंवार मागणी करून मानसिक त्रास दिला. पीडित महिलेने (वय ३७, रा. निजामपूर, सध्या रा. माणगाव) याबाबतची फिर्याद दिल्यानंतर माणगाव पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

## शिवसेनेचे पेण विधानसभा संघटक बाळा म्हात्रे शिंदे गटात

**पेण : प्रतिनिधी**

रायगडमधील शिवसेनेचे तीन आमदार एकनाथ शिंदे यांच्या गटासोबत राहिल्याने रायगडमध्ये शिवसेनेत दोन गट निर्माण झाले असतानाच पेण शिवसेनेचे विधानसभा संघटक बाळा म्हात्रे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन अलिबाग राजमळा येथील श्रीराज निवासस्थानी आमदार दळवी यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.


(छाया : अनिस मनियार)

मागील महिन्यात दळवी समर्थकांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले तसेच ठाकरे समर्थकांनी शिवसेना मेळाव्याचे आयोजन केले. मात्र त्यामध्ये पेणचे जिल्हा संघटक बाळा म्हात्रे हे कोणत्याच गटात पाहायला मिळाले नाहीत. परंतु सोमवारी पेण विधानसभा संघटकपदाचा राजीनामा देऊन बाळा म्हात्रे यांनी आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेतली. आमदार दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन त्यांना पाठिंबा दर्शवत असल्याचे बाळा म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.

## तीन वर्षांच्या बालकाचे अपहरण करणाऱ्यास बेड्या

### अलिबाग पोलिसांनी केली चिमुरड्याची सुटका

**अलिबाग, पेण : प्रतिनिधी**

अवघ्या तीन वर्षांच्या चिमुरड्याला पळवून नेणाऱ्या लफंग्याला अलिबाग पोलिसांनी काही तासातच मोठ्या शिताफीने अटक केली. त्याच्या तावडीतून त्या बालकाची सुटका करून त्याला आईच्या ताब्यात दिले. बाळ हातात येताच आईचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.



मधुकर नारायण पारधी असे आरोपीचे नाव आहे. तो अलिबाग तालुक्यातील भोपोली इथला राहणारा असून कुरूळ इथं मजुरीच्या कामासाठी येत असे. तिथे त्याची संदीप नाईक यांच्या कुटुंबाशी ओळख झाली. संदीप नाईक यांचा तीन वर्षांचा मुलगा संदेश घरात एकटाच होता. नाईक व त्यांची पत्नी कविता हे कामानिमित्त बाहेर होते. त्याचा फायदा घेत मधुकर याने संदेशला पळवून नेले. संध्याकाळी घरी आल्यावर संदेश घरात नाही हे पाहून आई वडिलांनी शोधाशोध सुरू केली. मात्र तो कुठेच सापडला नाही, म्हणून अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

तक्रार दाखल होताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. सुरूवातीला वाडगाव, त्यानंतर आरोपी रहात असलेल्या भापोली गावात जावून चौकशी केली. तेव्हा मधुकर पेण तालुक्यातील आसाने या त्याच्या सासरवाडीच्या गावी गेला असावा, अशी माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी रात्रीच आसाने गाठले. तेथील आदिवासी वाडीवरून आरोपी मधुकर याला ताब्यात घेतले आणि संदेशला त्याच्या आईच्या ताब्यात दिले. अलिबागचे पोलीस निरीक्षक एस. डी. सणस यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक दत्तात्रय जाधव, सहाय्यक उपनिरीक्षक शशिकांत सुतार, अतुल मैंद, सुनील फड, उदय सावंत आदींनी या कारवाईत भाग घेतला.



## वनवासी बांधवांसाठी फिरता दवाखाना

### आमदार महेश बालदी यांचा उपक्रम

**चौल : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने वनवासी बांधवासाठी फिरता दवाखाना सुरू करण्यात आला असून या सेवेची सुरुवात चौक विभागातून झाली आहे.

ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी आणि कुटुंबीयांच्या हस्ते नुकतेच रेवदंडा येथे करण्यात या फिरत्या दवाखान्याचे लोकार्पण करण्यात आले. आमदार महेश बालदी यांच्यासह भाजपचे उरण, पनवेल, खालापूर येथील पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच वनवासी बांधव या वेळी उपस्थित होते.

यानंतर हा फिरता दवाखाना शनिवारी (दि. २३) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आला, तर रविवारी (दि. २४) चौकनजीकच्या नानीवली वाडीतील वनवासी बांधवांच्या सेवेने या फिरत्या दवाखानाच्या लोकसेवेची सुरूवात झाली. भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, सरचिटणीस प्रविण जांभळे, चौक जि. प. विभाग अध्यक्ष गणेश मुकादम, चौकचे माजी उपसरपंच गणेश कदम, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, चांभार्ली ग्रामपंचायत सदस्य सचित कुरंगळे, भाजप युवामोर्चा तालुका सरचिटणीस स्वप्निल मुकादम, चौक शहर अध्यक्ष प्रकाश घोगरे, सरचिटणीस चिन्मय चौधरी, बूथ अध्यक्ष हरी दरवडा, पंकज शहा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, आदिवासी बांधव उपस्थित होते.

## सुधागडातील शेतकऱ्यांना खतांचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आसरे गावातील ४० शेतकऱ्यांना नुकतेच प्रत्येकी पाच किलो खताचे वाटप करण्यात आले. मनसे सुधागड तालुका उपाध्यक्ष संदीप राम मालुसरे यांच्या आर्थिक सहाय्याने हा खतवाटप कार्यक्रम घेण्यात आला.

कोरोनामुळे शेतकऱ्यांना आर्थिक व इतर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सहकार्य करावे, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. आगामी काळात आणखी ५० ते ६० शेतकरी बांधवांना खत वाटप करायचे आहे, असे संदीप मालुसरे यांनी या वेळी सांगितले.

मनसेचे नवघर विभाग अध्यक्ष शेखर चव्हाण, आसरे गावचे शाखा अध्यक्ष निखिल ठकोरे व मनसैनिकांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले. खतवाटपाचे नियोजन रवींद्र कदम यांनी केले होते.

## रा.स्व.संघातर्फे मुरूड येथे वृक्ष लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पर्यावरण विभाग व मोरया गृप -नांदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यांतील उसरोली, नांदगाव समुद्र किनारा, नागेश्वर नगर व वाघोबा मंदिर परिसरात चिंच, बोर, बांबू, बहावा, करंज, आवळा असे विविध प्रकारची १२० झाडे लावण्यात आली.

रा.स्व. संघ पर्यावरण विभाग जिल्हा सहप्रमुख महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ४९ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे या वृक्षारोपण मोहिमेत भाग घेतला.

पेड, पाणी आणि प्लॉस्टिक या विषयांवर मुरूड तालुक्यात भरीव काम उभे करणार असल्याचे महेंद्र पाटील यांनी सांगितले.

जागतिक स्वच्छता दिनी १७ सप्टेंबर रोजी समुद्र किनारे स्वच्छ करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या मोहिमेत सागरी सीमा सुरक्षा मंचचे कोकण प्रांत संघटन मंत्री अनिकेत कोंडाजी, अशासकीय संस्थेचे निलेश गुंड, समीर चोरघे, कोळी समाज सचिव आतिष आग्रावकर, समीर उपाध्ये, संजय ठाकर, कुणाल गाणार, विनोद जोशी आदी सहभागी झाले होते.


(छाया : संजय करडे)


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमिन मालक **१) श्री. शैलेश उर्फ शैलेंद्र शंकर कदम, २) श्री. सुभाष शंकर कदम, ३) श्रीमती मनिषा शंकर कदम उर्फ मनिषा सुभाष शिंदे, ४) श्रीमती हेमा शंकर कदम उर्फ शिवानी संदीप साळुंखे, ५) श्रीमती जयश्री शंकर कदम** यांच्याकडून विकसनास घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-कोयनावेळे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं. / हि. नं. | | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २/४ अ | | ०-१९-२० | १.३२ |
| | पो.ख. | ०-०१-०० | |
| | एकूण | ०-२०-२० | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २५/०७/२०२२.**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**मो. क्र. : ९९३०३६९८६१**



## - पेपर समन्स -

**मा. न्यायाधिश सहकारी न्यायालय रायगड रत्नागिरी मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड-रत्नागिरी)**
**मुकदमा क्र.सी.सी./आर.जी.डी./४८/२०२१**

दि. अण्णासाहेब सावंत को.ऑप. अर्बन बँक महाड, लि. वतीने श्री. महादेव शंकर येरूणकर शाखाधिकारी, शाखा कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड — वादी

**विरुद्ध**

१. श्री. दिलीप गोपाळ कुडतील
मु. फ्लॅट नं. १०३, ओम पॅराडाईज, फ्लॅट नं. ७२, ता. कर्जत, जि. रायगड प्रोप्रा. मॅग्ना ग्रुप, शॉप नं. २, विशाल प्राईड, प्लॉट नं. ५९, सेक्टर ५०, सीवुड्स, नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६
२. श्री. रुपेश रविंद्र मांडे
मु. मुद्रे, पो. मुद्रे, ता. कर्जत, जि. रायगड
३. श्री. समिर बाबु बोराडे
मु. ११३/५, धाकटेपेंड गाव, ता. कर्जत, जि. रायगड
४. सौ. शुभांगी लक्ष्मण शेणॉय
रा. सावित्री स्मृती बिल्डींग, दत्त मंदिर रोड, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०५५
तर्फे अखत्यारी श्री. दिलीप गोपाळ कुडतील
मु. फ्लॅट नं. १०३, ओम पॅराडाईज, फ्लॅट नं. ७२, ता. कर्जत, जि. रायगड प्रोप्रा. मॅग्ना ग्रुप, शॉप नं. २, विशाल प्राईड, प्लॉट नरं. ५९, सेक्टर ५० सीवुड्स, नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६
— प्रतिवादी

दावा रक्कम रुपये ५३,६२,८३४/-

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०५/०८/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११:०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पुर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/०७/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता - सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशीयल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



प्रोसेस जमा ता.

मे. गुलाल सो.
अॅड. इर्शाद शेख पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज.क्र.११५९/२०२२
नि. ८/ड
ने.ता. ७/९/२०२२

१) श्रीमती. रमाबाई शामा पाटील,
वय- वर्षे, धंदा- गृहिणी
२) श्री. ज्ञानेश्वर शामा पाटील,
वय- ६१ वर्षे, धंदा- शेती,
३) श्री. भोलानाथ शामा पाटील,
वय- ५६ वर्षे, धंदा- शेती,
४) श्री. अशोक शामा पाटील,
वय- ४० वर्षे, धंदा- शेती,
क्र. १ ते ४ रा. पेंधर गांव, पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड
५) श्रीमती. विठाबाई राजाराम पाटील
वय- ६४ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. घर नं. १८९/ए-२, ओवे पेठ, सेक्टर ३३, मराठी शाळेजवळ, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड
६) सौ. उषा मधुकर म्हात्रे,
वय- ४३ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. १५बी, आग्री समाज हॉल जवळ, सेक्टर १४, कामोठे, कळंबोली नोड, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८
७) सौ. कल्पना धनाजी काथारा,
वय- ३८ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. वसंत नगर, नेवाळी, आदई, ता. पनवेल, जि. रायगड
८) सौ. शोभा घनश्याम घरत,
वय- ४५ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. सी-१०२, मधुकुंज विहार सोसायटी, प्लॉट नं. इ/६०, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड,
९) सौ. आशा बळीराम म्हात्रे,
वय- ५२ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. घर नं. १९, रोड नं. ५, रिलायन्स कॉलनी समोर, सेक्टर १९, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
१०) श्रीमती प्रभावती धर्मराज घरत,
वय- ४९ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. महादेव पार्वती निवास, प्लॉट नं. ६, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड
११) सौ. शैला नरेंद्र गावंड,
वय- ५० वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. रुम नं. ३०२, सी-विंग, विशा आर्केड सोसायटी, प्लॉट नं. १०, सेक्टर ४, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड
— **अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ यांचे पती आणि अर्जदार क्र. २ ते ११ यांचे वडील कै. शामा विठु पाटील यांचे दि. २८/०१/२०२२ रोजी देहावसान झाले आहे. कै. शामा विठु पाटील यांची आई महादीबाई विठु पाटील यांचे दि. ११/०२/२००८ रोजी देहावसान झाले आहे. तसेच कै. शामा विठु पाटील यांचे वडील कै. विठु अर्जुन पाटील यांचे देखील दि. ०१/०८/१९८२ रोजी देहावसान झाले आहे. कै. शामा विठु पाटील यांचे मृत्युपश्चात त्यांना हिंदु कायद्यातील तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. श्री. रमाबाई शामा पाटील वगैरे ह्यांनी कै. शामा विठू पाटील यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. कै. शामा विठु पाटील यांच्या नावे असलेल्या मौजे-पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादनात समाविष्ट केलेल्या आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे -

| अनु. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | पेंधर ८ए | २४०/३अे | ०-२९-६ | ५-५० |
| | | २०१/१ | ०-१३-९ | २-१९ |
| | | २०१/४ | ०-१०-१ | ०-२२ |
| २ | पेंधर ९३ | २५४/२ | ०-६०-४ | ६-३१ |
| ३ | पेंधर २७० | २४१/१ | ०-७६-६ | १४-०६ |
| ४ | पेंधर १/२००८ | २५४/३अ+ ३ब+ ४/१ | ०-२५-५ | २-२५ |

सदरहू मिळकतींचे संपादनाचे मोबदल्यापोटी मे. सिडको लि. यांचेकडुन मिळणारा भुखंड, नुकसान भरपाई आणि इतर फायदे.

३) कै. शामा विठु पाटील यांच्या नावे असलेल्या मौजे-पेंधर, मौजे-वलप, ता. पनवेल, जि.रायगड येथील शेतजमिन ज्यांचे वर्णन खालीलप्रमाणे -

| अनु. क्र. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | भुधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेंधर | २१३/६ | १ | ०-३०-०० | ०.०६ |
| २ | पेंधर | १४३/३ | २ | ०-०३-०० | ०.०९ |
| ३ | पेंधर | २१३/३ | १ | ०-०६-०० | ०.१६ |
| ४ | पेंधर | २१३/४/५ | १ | ०-०२-०० | ०.०६ |
| ५ | पेंधर | ४/२ | १ | ०-०७-०० | ०.१९ |
| ६ | पेंधर | ४/३ | १ | ०-१७-०० | ०.४७ |
| ७ | पेंधर | २४१ | १ | ०-७६-६० | १४.०६ |
| ८ | पेंधर | २५४ | २ | ०-६०-४० | ०० |
| ९ | वलप | ७८ | १ | ०-२८-९० पो.ख. ०-०२-०० | ५.६२ |

वर श्री. रमाबाई शामा पाटील वगैरे हे कै. शामा विठू पाटील यांचे कायदेशिर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्री. रमाबाई शामा पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. शामा विठू पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २५ जुलै २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

## निवडक

### गुटखा विक्रीप्रकरणी दोघे अटकेत

**पनवेल :** प्रतीबंधित अन्नपदार्थ गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्या दोघांजणाविरुद्ध अन्न व सुरक्षा पथकाने व तसेच शहर पोलिसांच्या पथकाने कारवाई केली आहे. शहरातील मॉर्डन स्वीट्सच्या बाजूला असलेल्या अनिल पान शॉप व निर्दोश पान शॉप या ठिकाणी बेकायदेशीररित्या प्रतीबंधित अन्नपदार्थ गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची विक्री करत असल्याची माहिती अन्न व सुरक्षा पथकाला मिळताच अधिकारी विक्रम निकम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने छापा टाकून अजित सिह (वय ३४) व निर्दोशकुमार साहू (वय ४२) या दोघांना ताब्यात घेऊन त्याच्या कडून जवळपास २२१२ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### शॉक लागून मुलीचा मृत्यू

**पनवेल :** तक्का दर्गा परिसरात विजेचा शॉक लागून एका दहा वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. फातिमा लालसाहब शेख असे या मुलीचे नाव आहे. फातिमा पाचवी इयत्तेत शिकत असून ती शाळेतून घरी आल्यानंतर बाहेर खेळत होती. या वेळी विद्युत डीपीच्या जवळ तिला अचानक शॉक लागला. तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. या वेळी डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवी मुंबईत पाण्यासंदर्भात एमआयडीसीसोबत करार

## उद्योगसमुहांना मिळणार टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टमधील पुनर्प्रक्रियेकृत सांडपाणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



(प्रातिनिधीक छायाचित्र)

केंद्र सरकारच्या अमृत योजनेंतर्गत कोपरखैरणे व ऐरोली येथील सी–टेक या अत्याधुनिक तंत्रप्रणालीवर आधारित मलप्रक्रिया केंद्रात प्रत्येकी २० द.ल.लि. क्षमतेचे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट उभारण्यात आले आहेत. या टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट मधील पुनर्प्रक्रियाकृत सांडपाणी टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील उद्योग समुहांना पुरविण्यात येणार आहे. नवी मुंबई महापालिकेचा तशा प्रकारचा करारही एमआयडीसीसोबत झालेला आहे.

अमृत योजनेंतर्गत उभ्या राहणाऱ्या या टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टचा ५० टक्के खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत उपलब्ध होणार असून ऐरोली येथील प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून कोपरखैरणे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टचे काम पूर्ण होऊन तेथे प्राथमिक चाचण्या सुरू झाल्या आहेत. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी कोपरखैरणे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टला भेट देऊन तेथील संपूर्ण कार्यवाहीची पाहणी केली व सविस्तर माहिती घेतली आणि उद्योग समुहांना पुनर्प्रक्रियाकृत पाणी प्रत्यक्ष पुरविण्याची कार्यवाही एक महिन्याच्या आत सुरू करावी, असे निर्देश अभियांत्रिकी विभागाला दिले. २० द.ल.लि. क्षमतेचा कोपरखैरणे येथील टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टचे काम पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे १.७५ द.ल.लि. क्षमतेचा भूस्तरीय जलकुंभ उभारण्याचे कामही पूर्ण झालेले आहे. हे पुनर्प्रक्रियाकृत सांडपाणी वाशी व कोपरखैरणे टिटीसी औद्योगिक क्षेत्रातील उद्योग समुहांना पुरविण्यासाठी ५३.१३४ कि.मी. लांबीच्या वितरण वाहिन्या टाकल्या जात आहेत.

उद्योग समुहांना पुनर्प्रक्रियाकृत सांडपाणी पुरविण्यासाठी एमआयडीसी क्षेत्रात महापे येथे भूखंड क्रमांक ओएस ५ येथे १.५ द.ल.लि. क्षमतेचा तसेच घनकचरा प्रक्रिया प्रकल्पानजिक तुर्भे येथे २.५ द.ल.लि. क्षमतेचा आणि निब्बाण टेकडी रबाळे येथे ०.७५ द.लि.लि. क्षमतेचा अशा तीन ठिकाणी उच्चस्तरीय जलकुंभ उभारण्यात आले आहेत.

एमआयडीसीला हे पाणी विक्री करून महापालिकेने ५०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. परंतु सध्या ४५० एमएलडी पाणी पुरवठ्यापैकी महापालिका सुरुवातीला १४ एमएलडी पाणी पुरवठा करण्याची तयारी केली आहे.

### मनपाच्या महसुलात भर

**प्रकल्पांमधील पुनर्प्रक्रियाकृत पाणी उद्योग समुहांना पुरविल्यामुळे महानगरपालिकेच्या महसूलात भर पडेलच याशिवाय महत्वाचे म्हणजे सध्या उद्योग समुहात वापरले जाणारे पिण्याचे पाणी बचत होऊन नागरिकांच्या वापरात येणार आहे. याशिवाय सध्या २२.५० रुपये मात्र प्रति घनमीटर इतक्या दरात उद्योग समुहांना उपलब्ध करून घ्यावे लागणारे पाणी महानगरपालिकेकडून १८.५० रुपये मात्र प्रति घनमीटर रक्कमेत उपलब्ध होणार असल्याने पाणी विकत घेण्यासाठी उद्योगसमुहांना येणाऱ्या खर्चात पुनर्प्रक्रियाकृत पाणी वापरल्याने बचत होणार आहे.**

# किल्ले सोंडाई परिसरात वृक्षारोपण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक तापमान वाढ आणि वाढते प्रदूषण रोखण्यासाठी दरवर्षी प्रमाणे किल्ले सोंडाई गडपरिसरात रविवारी (दि.२४) वृक्षारोपण मोहीम झाली.



मानवी आयुष्यात झाडांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. झाडे आहेत म्हणून आपण या पृथ्वीतलावर सुखरूप राहू शकतो, कारण या झाडांपासून आपल्याला जीवनावश्यक असलेल्या प्राणवायू मिळतो, असे मत वृक्षारोपण करतेवेळी शिवकार्य ट्रेकर्सचे संस्थापक रोहिदास ठोंबरे यांनी व्यक्त केले.

शिवकार्य ट्रेकर्स टीम गेली पाच वर्षे सातत्याने किल्ले सोंडाई गडपरिसरात संवर्धनासाठी मोहिमा घेत आली आहे. आजसुद्धा आपली सामाजिक बांधिलकी जपून किल्ले सोंडाई परिसरात बांबू, गुलमोहर, आपटा, शिसव, निलगिरी आदी प्रकारची झाडे लावण्यात आली.

वृक्षारोपण मोहीम शिवकार्य ट्रेकर्स खालापूर विभाग वतीने आणि वनविभाग अलिबाग, वनपरिक्षेत्र खालापूर कर्जत तसेच ग्रामपंचायत बोरगाव व सोंडेवाडी ग्रामस्थ वतीने घेण्यात आली. या मोहिमेत शिवकार्यचे संस्थापक रोहिदास ठोंबरे, बोरगाव ग्रामपंचायत उपसरपंच पप्पू झोरे, वनपाल रमेश झोरे, महेश दुर्गे, प्रसाद जाधव, जितेंद्र कदम, मंदार उतेकर, आकाश गोडीवले, रमेश शिंदे, विकास मालुसरे, मनीष आमकर, प्रशांत शेलार व सागर गंभीरराव हे दुर्गसेवक सहभागी झाले होते.

## डिझेल कोट्याबाबत सकारात्मक प्रतिसाद

# मच्छीमारांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**उरण : वार्ताहर**



डिझेल कोटा मंजूर करण्याची मागणी मच्छीमार संस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत केली आहे. मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी तत्काळ यासंदर्भात सुचना दिल्या. त्यामुळे मच्छीमारांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

२०२२–२०२३च्या आर्थिक वर्षांत १२० अश्वशक्ती इंजिन वरिल नौकांना राज्यातील डिझेल कोट्याच्या प्रस्तावातून वगळण्याचा निर्णय राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागामार्फत घेतल्याचे दिसत असून यामुळे मच्छीमारांना मासेमारी करणे अडचणीचे होणार असल्याने सरकारने डिझेल कोटा मंजूर करण्याची मागणी मच्छीमार संस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत केली आहे. मच्छीमार नेते मार्तंड नाखवा आणि हेमंत गौरीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मच्छीमारांच्या समस्या त्यांच्या समोर मांडताच त्या सोडविण्यासाठी अग्रक्रम देण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याने मच्छीमार जनतेत आनंद व्यक्त होत आहे.

राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागामार्फत नवीन यांत्रिक नौका बांधणी करिता राबविण्यात आलेल्या योजनेत नौकांना १०० ते २०० अश्वशक्तीचे इंजिन वापरण्याचीमूभा आपल्या मत्स्यव्यवसाय विभागाने दिल्यामुळेच रा.स.वि.नी. योजनेंतर्गत बांधलेल्या ८५ ते ९० टक्के नौकांवर १२० अश्वशक्तीवरील इंजिन बसविण्यात आलेली आहेत. जर संबंधित नौका डिझेल कोट्यातून वगळण्यात आल्या तर डिझेलच्या वाढत्या किंमतीचा विचार करता वरील नौका मासेमारी करता जाऊ शकत नसल्याने संबंधित नौकांवर विसंबून असणाऱ्या लाखो लोकांचा रोजगार बुडून त्यांच्यावर उपासमारीची पाळी येणार आहे. तसेच आपल्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत रा.स.वि.नी. योजनेंतर्गत संबंधित नौकांना दिलेल्या अर्थसाहाय्यची परतफेड होण्यास मुश्किल होणार आहे.

# खारघरमध्ये आढळला तब्बल आठ फुटी अजगर

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर सेक्टर–१२ येथे खारघरचा राजा मंदिराजवळील रस्त्यावर रविवारी (दि. २४) सकाळी अजगर आढळले. नागरिकांनी तातडीने सर्पमित्रांना पाचरण केले. पुनर्वसू फाउंडेशन या सर्पमित्र संस्थेचे सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी तो साप नसून अजगर असल्याचे लक्षात आले. शीताफीने या अजगरास पकडून जंगलात सोडण्यात आले.



खारघर सेक्टर–१२ येथे खारघरचा राजा मंदिराजवळील रस्त्यावर रविवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या दरम्यान एक मोठा साप आल्याची माहिती फोनवरून पुनर्वसु फॉउंडेशन संस्थेस तेथील नागरिकांनी दिली. ही माहिती संस्थेचे सर्पमित्र मयुरेश उमेश नार्वेकर यांना देण्यात आली. मयुरेश आपले सहकारी सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना घेऊन त्वरित घटना स्थळी जाण्यास रवाना झाले. घटनास्थळी पोहचेपर्यंत सापला रस्त्यावर जमलेल्या जमवाने घेराव घातलेला होता. सर्पमित्रांनी पाहिले नागरिकांना सापापासून दूर केले, मात्र अष्टविनायक मोरे यांनी पाहणी केल्या लक्षात आले साप नसून की एक साधारण आठ ते नऊ फूट लांबीचा भारतीय अजगर आहे. ते अजगर रस्ता पार करण्याचा प्रयत्न करत होते. आजूबाजूला लोकवस्ती तसेच रस्ता असल्यामुळे ते अजगर गाडी खाली येऊन मरण्याची शक्यता होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्पमित्रांनी त्वरित बचावकार्य सुरू केले. काही वेळातच अजगरला सुरक्षितरित्या पकडण्यात पुनर्वसु फॉउंडेशन टीमला यश आले. त्यानंतर अजगरास जमावाद्वारे कोणत्या प्रकारची इजा पोचवण्यात आली आहे का? कोठे लागले आहे का? याची तपासणी करण्यात आली.

दरम्यान अजगरास कोणत्याही प्रकारची इजा झालेली आढळून आली नसल्याने अजगर सुरक्षित असल्याची खात्री करण्यात आली. त्यानंतर नागरिकांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी अष्टविनायक व मयुरेश यांनी सापाविषय लोकांना माहिती दिली. त्यानंतर वनविभागास घटनेची माहिती देऊन अजगरास सुखरूपरित्या जंगलात सोडून देण्यात आले.

# नवी मुंबईत ट्रान्झिस्ट कॅम्प बांधावेत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत ट्रान्झिस्ट कॅम्प बांधावेत, अशी मागणी भाजप जिल्हा युवा सचिव नरेंद्र झुरानी यांनी आयुक्तांकडे केली आहे.

**भाजप नेते नरेंद्र झुरानी यांची मागणी**

सीवूड्स विभागामध्ये सिडको इमारतींमधील पडझड सातत्याने सुरू असल्याने वसाहतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे जीव टांगणीला लागला आहे. सातत्याने स्लॅब कोसळून रहिवाशांना दुखापत होणे सुरू आहे. भविष्यात अशा जीवितहानी दुर्घटना घडू शकते याला नाकारता येत नाही. महानगरपालिकेच्यावतीने सिडको वसाहतीमध्ये स्ट्रक्चर ऑडिट लवकरात लवकर करून घेणे आवश्यक आहे.

ज्या घर आणि बिल्डिंग अतिधोकादाक आहेत त्या रहिवाशांना तिकडुन स्थलांतर करून तात्पुरत्या स्वरूपात नवी मुंबई महानगरपालिकेने राहायची व्यवस्था करावी. प्रत्येक रहिवासीयांच्या सुरक्षेसाठी ट्रांसिस कॅम्प बांधण्यात यावा आणि प्रत्येक सोसायटीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी झुरानी यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# उरणमधील पंपांवर सीएनजीचा तुटवडा

### वाहनांच्या लांबच लांब रांगा



**उरण : वार्ताहर**

उरणमध्ये वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे पंपांवर शेकडो वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. उरणच्या पेट्रोल विविध पंपावर याआधीच सीएनजीचा तुटवडा भासत आहे.

सध्या उरण परिसरातील एक दोन सीएनजी पंप वगळता अन्य पंप बंदच आहेत. त्यामुळे सीएनजीचा तुटवडा उरणकरांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. त्यामुळे उरण परिसरातील सीएनजीचा तुटवडा निर्माण झाला होता. सीएनजीवर व्यवसाय करणाऱ्या रिक्षा, कार, टॅक्सी, टेम्पो तसेच अनेक खासगी गाड्यांचे वाहकही विविध पेट्रोल पंपावरच गाड्या उभ्या करून सीएनजीच्या प्रतीक्षेत रांगेत उभे असतात, मात्र कधी सीएनजीसी संपलेला तरी असतो किंवा वीजपुरवठा खंडित झाल्याने वाहनधारकांना कायम प्रतीक्षा करावी लागते. रविवारी (दि. २४) वीजपुरवठा खंडित झाल्याने बोकडवीरा पंपावर पेट्रोल शेकडो वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. विचारणा केल्यानंतर नेहमीप्रमाणे पाहतो, काम सुरू आहे अशी कारणे अधिकाऱ्यांकडून दिली जातात.

सीएनजी ॅगॅस पंपावर गॅस उपलब्धता कमी असल्याने उरण मधील सीएनजी ॅगॅस पंपावर खूपच रांगा असतात त्यामुळे रिक्षाला तीन–ते चार तास रांग लावावी लागते. रिक्षेचे लोन, त्यातच प्रवासी कमी,त यामुळे घरखर्च भागविणे पडवत आमचे उदरनिर्वाह रिक्षाच्या कमाईवर त्यातच कधी गॅसची कमतरता तर कधी वीज गायब अशी समस्या नेहमीच उद्भवत असते. त्यामुळे आमच्या धंद्यावर त्याचा परिणाम झाला आहे, अशी खंत रिक्षाचालकांनी व्यक्त केली आहे.

# नवी मुंबईत रंगला फॅशन शो; विविध डिझाईन्स लोकांसमोर सादर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीबीडी बेलापूरमधील हॉटेल पार्कमध्ये रविवारी झालेल्या फॅशन शोमध्ये नामांकित मॉडेल्सची झलक नवी मुंबईकरास पाहण्यास मिळाली. भारत आणि आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त अशा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते. या फॅशन शोचे एन.एस.ए.एम संचालक आयुष जैन, संस्थापक नीरु जैन हे या वेळी उपस्थित होते.


सहा सिक्केन्सेसमध्ये झालेल्या या शोमध्ये साठहून अधिक डिझाईन्स लोकांसमोर आणल्या गेल्याची माहिती एन.एस.ए.एम चेसंस्थापक निरू जैन व आयुष् जैन यांनी दिली. एन.एस.ए.एम या इव्हेंट अंतर्गत झालेल्या या फॅशन शोमध्ये नामवंत मॉडेल्स, डिझाइनर्स, कोरीओग्राफर्सनी भाग घेतला. आगामी फॅशनची झलक पाहण्याची इच्छा असलेल्या नवी मुंबईकरांनी या शोला प्रचंड गर्दी केली होती.



पहिल्या वर्षी डिझाइन विजेता २०२१– श्रेया प्रजापती, द्वितीय वर्षाचे डिझाइन विजेते २०२१– श्रेया रंजन, पदवी संग्रह विजेता २०२१ – कांचन सिंग, पदवी संग्रह विजेता २०२० – बिल्किस नियाझी, इंटिरियर डिझाइन विजेता गट १. सुहानी जैन, २. विष्णू पवार, ३. दिक्षा तळेकर या प्रकारे विजेत्यांनी आपले नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणाकडे लक्ष केंद्रित केले आहे.

एन.एस.ए.एन इन्स्टिटयूट ऑफ डिझाईनचे संस्थापक श्रीमती नीरू जैन आणि संचालक आयुष जैन यांनी जुलै २०१९ मध्ये स्थापना केली. एन.एस.ए.एन इन्स्टिटयूट नवी मुंबईच्या प्रीमियर संस्थेमध्ये फॅशन, डिझाइन्स, स्टाइलिंग, कला आणि व्यवसायासाठी मान्यताप्राप्त आहे. एन.एस.ए.एम अकादमी यु.जि.सी मान्यताप्राप्त विद्यापीठ, संगाई इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, मणिपूर, भारत आणि आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्यापीठ, सेंट्रल ख्रिश्चन युनिव्हर्सिटी ब्लांटायर, मलावी शहराशी संबंधित आहे. आंतरराष्ट्रीय मानके राखून विद्यापीठे शिक्षणाच्या विविध पद्धतींना प्रोत्साहन देतात आणि उच्च श्रेणीची पात्रता देतात. त्यांचे अभ्यासक्रम हे उदयोग–चालित कार्यक्रम आहेत जे विद्यार्थ्यांना सतत अद्ययावत होणाऱ्या फॅशन उद्योगात सर्जनशील तज्ञ म्हणून काम करण्यास तयार करतात.

डेफिल्ड डे मोड हा वार्षिक डिझाईन अवॉर्ड शो आहे, जिथे विद्यार्थ्यांची मेहनत, प्रतिभा आणि सर्जनशीलता यांना एक व्यासपीठ मिळते. दरवर्षी एक थीम दिली जाते आणि त्यानुसार त्यांची रचना आणि अंतिम वर्ष मिळते त्यांचे ग्रॅज्युएशन कलेक्शन आहे जे रॅम्प मिळवते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून लोकमतचे उपाध्यक्ष डॉ. विजय शुक्ला विकासक आणि बिल्डर दिनेश जैन आणि ड्रीम डेव्हलपर्सचे मालक प्रख्यात शिक्षणतज्ञ नितेश मुळे, भावेश परमार आणि विकास चव्हाण उपस्थित होते.



# नमुना -१

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी महाड यांचे**
**कार्यालय ता. महाड, जि. रायगड**
**दिनांक : १४/०७/२०२२**

**क्रमांक :- भूसंपादन/कात-५/गोळेगणी व पैठण/थेजख/नोटीस/२०२२**

ज्याअर्थी, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड - अलिबाग यांनी मौजे गोळेगणी व पैठण लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे गोळेगणी व पैठण या गावांतील खाजगी जमिनी, लघुपाटबंधारे योजना गोळेगणी व पैठण ता. पोलादपूर, जि. रायगड या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, कळवा, ठाणे यांजकडे पत्र नं. जा.क्र.मृ.व.ज.सं.वि/कळवा-ठाणे/प्रशा-३/६८१/२०२२, दिनांक ०२/०३/२०२२ अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक भूसंपादन/ टे-६/ मौ. मौजे गोळेगणी व पैठण/२०२२ दिनांक ११/०३/२०२२ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी प्रतिमा पुदलवाड - शेंगुलवार, उपविभागीय अधिकारी महाड याद्वारे,

१. अनुसूची एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल -१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांचेकडे दाखल करावीत.

५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### अनुसूची - १

### मौजे गोळेगणी, ता. पोलादपूर, जि. रायगड

| अनु. | गट नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ७६२ अ | ०.४८.८५ | ०.९३ |
| २ | ७७२ अ | १.११.९० | ०.९८ |
| ३ | ७७३ अ | ०.१४.७५ | ०.२७ |
| ४ | ७७६ | ०.१०.२५ | ०.५६ |
| ५ | ७९१ | ०.०८.५० | ०.२५ |
| ६ | ७९२ | ०.०८.४७ | ०.३४ |
| ७ | ८८५ | ००.००.५० | ०.४९ |
| ८ | ८८७ | ०.१८.०० | ०.१२ |
| ९ | ८८९ | ०.१४.६२ | ०.२५ |
| १० | ८९० | ०.१३.०० | ०.११ |
| ११ | ८९१ | ०.०५.०० | ०.०२ |
| १२ | ८९२ | ०.२१.०० | ०.६२ |
| १३ | ८९३ | ०.०२.०० | ० |
| १४ | ८९४ | ०.८०.५० | ०.४५ |
| १५ | ८९५ | ०.१६.२५ | ०.०८ |
| १६ | ८९६ | ०.१०.०० | ०.०५ |
| १७ | ८९७ | ०.२३.१० | १.५१ |
| १८ | ८९८ | ०.०९.६० | ०.७८ |
| १९ | ८९९ | ०.०१.०० | ०.०८ |
| २० | ९०० | ०.३४.२० | १.५९ |
| २१ | ९०१ | ०.५७.०० | १.४० |
| २२ | ९०२ | ०.३७.०० | ०.०६ |
| २३ | ९०३ | ०.०१.०० | ० |
| २४ | ९०४ | ०.३८.७६ | ०.३३ |
| २५ | ९०५ | ०.५३.०० | ०.५३ |
| २६ | ९०६ | ०.०९.६३ | ०.१२ |
| २७ | ९०९ | ०.०७.२० | ०.०९ |
| २८ | ९२० | ०.२५.०० | ०.५१ |
| २९ | ९२१ | ०.२३.१३ | ०.१७ |
| ३० | ९२४ | ०.१६.०० | ०.०८ |
| ३१ | ९२५ | ०.०३.०० | ०.०३ |
| ३२ | ९४५ | ०.०४.३८ | ०.०८ |
| ३३ | ९४६ | ०.१५.७५ | ०.२५ |
| ३४ | १०१२ | ०.१८.७९ | ०.१२ |
| ३५ | १०१३ | ०.०१.६० | ०.०२ |
| ३६ | १०१४ | ०.०९.०० | ०.२२ |
| ३७ | १०१५ | ०.०९.०० | ०.०३ |
| ३८ | १०१६ | ०.०५.९० | ०.१६ |
| ३९ | १०१७ | ०.०८.१० | ०.७२ |
| ४० | १०१८ | ०.०९.६० | ०.७८ |
| ४१ | १०१९ | ०.१७.५० | १.२० |
| ४२ | १०२० | ०.०९.९० | ०.८९ |
| ४३ | १०२१ | ०.०२.०० | ०.१६ |
| ४४ | १०२२ | ०.१४.४० | १.१७ |
| ४५ | १०२३ | ०.०९.६० | ०.३३ |
| ४६ | १०२४ | ०.०५.०० | ०.०२ |
| ४७ | १०२५ | ०.१२.०० | ०.०६ |
| ४८ | १०२६ | ०.०९.०० | ०.०६ |
| ४९ | १०२८ | ०.०९.०० | ०.०९ |
| ५० | १०२९ अ | ०.३८.८१ | ०.२५ |
| ५१ | १०३० अ | ०.१३.२५ | ०.१९ |
| ५२ | १०३८ अ | ०.०३.०० | ०.१२ |
| ५३ | १०३९ | ०.०९.०० | ०.११ |
| ५४ | १०४० | ०.०१.०० | १.१९ |
| | **एकूण** | **९.५७.७९** | |

### मौजे पैठण, ता. पोलादपूर, जि. रायगड

| अनु. | गट नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २५ | ०.११.७ | ०.१८ |
| २ | २९ | १.६४.० | ०.०१ |
| ३ | ३० | ०.०१.८ | ०.०६ |
| ४ | ३८ | ०.१९.६ | १.९९ |
| ५ | ३९ | ०.३०.८ | ३.२१ |
| ६ | ४० | ०.०३.०० | ०.२५ |
| ७ | ४१ | ०.१०.७० | ०.८८ |
| ८ | ४२ | ०.०७.८० | ०.६७ |
| ९ | ४३ | ०.१४.९० | १.१२ |
| १० | ४४ | ०.१६.७० | १.५१ |
| ११ | ४५ | ०.११.९० | १.०० |
| १२ | ४६ | ०.१५.७० | १.५० |
| १३ | ४७ | ०.११.९० | ०.९४ |
| १४ | ४८ | ००.२२.८० | १.७४ |
| १५ | ४९ | ०.०३.० | ०.२३ |
| १६ | ५० | ०.३८.० | १.८९ |
| १७ | ५१ | ०.०७.८ | ०.५९ |
| १८ | ५२ | ०.५०.२ | १.३८ |
| १९ | ५३ | ०.११.७ | ०.७५ |
| २० | ५४ | ०.०६.० | ०.०३ |
| २१ | ५५ | ०.०८.० | ०.०३ |
| २२ | ५६ | ०.०७.० | ०.०३ |
| २३ | ५७ | ०.०७.० | ०.०३ |
| २४ | ५८ | ०.५३.० | ०.२७ |
| २५ | ५९ | ०.३४.० | ०.१७ |
| २६ | ६० | ०.५३.० | ०.२७ |
| २७ | ६१ | ०.१०.० | ०.०५ |
| २८ | ६२ | ०.१७.० | १.०६ |
| २९ | ६३ | १.१५.० | ०.५५ |
| ३० | ६४ | ०.१२.९ | ०.८४ |
| ३१ | ६५ | ०.०४.० | ०.०२ |
| ३२ | ६६ | ०.०२.० | ०.०२ |
| ३३ | ६७ | ०.०४.३ | ०.०२ |
| ३४ | ६८ | ०.०५.७ | ०.२३ |
| ३५ | ७० | ०.०७.० | ०.०३ |
| ३६ | ७१ | ०.०५.६ | ०.२४ |
| ३७ | ७२ | ०.०२.८ | ०.१० |
| ३८ | ७३ | ०.६२.० | ०.४४ |
| ३९ | ७४ | ०.०४.३ | ०.०८ |
| ४० | ७९ | ०.०५.० | ०.४४ |
| ४१ | ८० | ०.०४.० | ०.०३ |
| ४२ | ८१ | ०.३६.० | ०.१२ |
| ४३ | ८२ | १.९१.० | १.१२ |
| ४४ | ८३ | ०.०१.० | ०.१२ |
| ४५ | ८५ | ०.२५.६० | ०.४४ |
| ४६ | ११० | ०.२०.० | ०.४३ |
| ४७ | ११३ | ०.०१.० | ०.०१ |
| ४८ | ११४ | ०.४७.० | ०.२८ |
| ४९ | ११५ | ०.०८.० | ०.०६ |
| ५० | ११६ | ०.२२.० | ०.०६ |
| ५१ | ११७ | ०.१४.४ | ०.८० |
| ५२ | ११८ | ०.२६.१ | ०.८७ |
| ५३ | ११९ | ०.८९.० | ०.३६ |
| ५४ | १२० | ०.५१.९ | १.२५ |
| ५५ | १२१ | ०.२०.० | ०.५० |
| ५६ | १२२ | ०.०७.१ | ०.३६ |
| ५७ | १२३ | ०.१२.५ | ०.३९ |
| ५८ | १२४ | ०.२५.० | ०.२३ |
| ५९ | १२५ | ०.१०.६ | ०.५६ |
| ६० | १२६ | ०.०८.३ | ०.०६ |
| ६१ | १२७ | ०.३४.० | ०.२२ |
| ६२ | १२८ | ०.१५.० | ०.२८ |
| ६३ | १३१ | ०.१३.५ | ०.३५ |
| ६४ | १३२ | ०.१२.५ | ०.०१ |
| ६५ | १६७ | ०.०२.० | ०.११ |
| ६६ | १७३ | ०.०८.० | ०.०२ |
| ६७ | १६८ | ०.२१.० | ०.४७ |
| ६८ | १६९ | ०.४२.१ | ०.५६ |
| ६९ | १७० | ०.०८.० | ०.१७ |
| ७० | १७१ | ०.०५.० | ०.९८ |
| | **एकूण** | **१६.६१.२०** | |

ठिकाण : महाड
दिनांक : १४/०७/२०२२
क्र. जिमाका/राअ/जाहि./७९/२०२२-२३

सही/-
(प्रतिमा पुदलवाड-शेंगुलवार)
उपविभागीय अधिकारी
महाड उपविभाग महाड

# भारताची विंडीजवर विजयी आघाडी

## रोमहर्षक लढतीत अक्षर पटेलची निर्णायक खेळी

**पोर्ट ऑफ स्पेन : वृत्तसंस्था**

दुसर्‍या एकदिवसीय सामन्यात भारताने वेस्ट इंडिजवर दोन गडी राखून रोमहर्षक विजय मिळविला. त्यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारताचा अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलने निर्णायक वेळी तडाखेबंद फलंदाजी करून विजय खेचून आणला.



भारत आणि वेस्ट इंडिजदरम्यान तीन सामन्यांची एकदिवसीय क्रिकेट मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना रविवारी पोर्ट ऑफ स्पेनमधील क्वीन्स पार्क ओव्हल मैदानावर झाला. वेस्ट इंडिजचा कर्णधार निकोलस पूरनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. शाय होपच्या शतकाच्या बळावर वेस्ट इंडिजने निर्धारित ५० षटकांत सहा गडी गमावून ३११ धावा केल्या. हे लक्ष्य पार करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने सावध सुरुवात केली. शिखर धवन आणि शुबमन गिल यांनी पहिल्या गड्यासाठी ४८ धावा जोडल्या, पण त्यानंतर ७९ धावांपर्यंत पोहचण्याआधीच भारताने आपले तीन गडी गमावले.

यानंतर श्रेयस अय्यर (६३) आणि संजू सॅमसन (५४) यांच्यातील ९९ धावांच्या भागीदारीने सामना भारताच्या बाजूने वळवला. दोघांनी अर्धशतकी खेळी केल्या. ते दोघे बाद झाल्यानंतर भारत पराभवाच्या छायेत आला होता, मात्र दीपक हुडा आणि अक्षर पटेलने लक्ष्याचा पाठलाग सुरू ठेवला. पटेलने जबरदस्त निर्णायक खेळी करून सामना शेवटच्या षटकापर्यंत खेचला.

भारताला विजयासाठी शेवटच्या षटकात आठ धावांची आवश्यकता होती. पटेलने चौथ्या चेंडूवर षटकार खेचून भारताला विजय मिळवून दिला. या दरम्यान त्याने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील पहिले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ३५ चेंडूत तीन चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने नाबाद ६४ धावा केल्या. त्याला या कामगिरीसाठी सामनावीराच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिज संघाच्या सलामीवीरांनी चांगली सुरुवात करून दिली. कायले मेयर्स आणि शाय होप यांनी पहिल्या गड्यासाठी ५५ चेंडूत ६५ धावांची भागीदारी केली. मेयर्स २३ चेंडूत ३९ धावा करून बाद झाला. त्यानंतर, ब्रुक्स आणि होप यांनी दुसर्‍या गड्यासाठी ७४ चेंडूत ६२ धावांची भागीदारी केली. ब्रुक्स ३५ धावा करून बाद झाला. ब्रँडन किंग शून्यावर बाद झाला. शाय होप आणि कर्णधार निकोलस पूरन यांनी चौथ्या गड्यासाठी ११७ धावांची भागीदारी केली. पूरन ७७ चेंडूत ७४ धावांची धडाकेबाज खेळी करून बाद झाला. या दरम्यान शाय होपने आपले शतक पूर्ण केले. त्याने १३५ चेंडूत ११५ धावा केल्या. भारताकडून शार्दुल ठाकूरने तीन, तर दीपक हुडा, अक्षर पटेल आणि युझवेंद्र चहलने प्रत्येकी एक बळी टिपला.



### वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**

६९व्या वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघ उपविजेता ठरला. अंतिम सामन्यात महाराष्ट्राने भारतीय रेल्वेकडून २१-३८ असा पराभव पत्करला.

हरयाणातील चरखी दादरी येथील बंदिस्त क्रीडा संकुलात झालेल्या रेल्वेविरुद्धच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने उंचावलेल्या आत्मविश्वासानिशी खेळ केला. प्रारंभी पिछाडीवर पडल्यानंतर काही वेळातच ८-८ अशी बरोबरी साधली. आकाश शिंदे आणि अस्लम इनामदार या जोडगोळीच्या बहारदार चढायांना बचावाचीही तोलामोलाची साथ मिळत होती. पहिल्या सत्रात रेल्वेकडे २०-१३ अशी आघाडी होती, परंतु दुसर्‍या सत्रात पवनने पहिल्याच चढाईत तीन आणि दुसर्‍या चढाईत दोन गुण घेत महाराष्ट्रावर लोण चढवत रेल्वेला २७-१३ अशी आघाडी मिळवून दिली. मग रेल्वेने वर्चस्वपूर्ण आणि कुशल रणनीतीने खेळ करीत महाराष्ट्राला डोके वर काढण्याची संधीच दिली नाही. अखेरीस १७ गुणांच्या फरकाने बाजी मारली.

महाराष्ट्राकडून अस्लमने चढायांचे सात गुण (एक बोनस), तर आकाशने चढायांचे चार गुण (एक बोनस) मिळवले. राहुल खाटीकने चढाईचा एक आणि पकडींचे दोन गुण मिळवले. संघनायक शंकर गदई, अक्रम शेख आणि मयूर कदम यांनी भक्कम बचावाचे प्रदर्शन केले. रेल्वेच्या विजयात पवन शेरावत (नऊ गुण), नितीन रावल (सात गुण) आणि विकास खंडोला (पाच गुण) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन १३ व १४ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते १३ ऑगस्टला सकाळी १० वाजता होणार आहे.



शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होणार आहे. उद्घाटन समारंभास लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, सेक्रेटरी नंदकिशोर धोत्रे, खजिनदार एस. जी. चव्हाण. स्पोर्ट्स प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, अशोक गिल्डा, मधुकर भगत, मदन गोवारी, संजय गोडसे, गौतम म्हस्के, माजी लायन अध्यक्ष मीना पोतदार, ज्योती देशमाने, भावना जेसवानी, शोभा गिल्डा अरवख उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धा बिगिनर्स, ११ वर्षांखालील, १३ वर्षांखालील, १५ वर्षांखालील, १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील मुली व मुले, महिला व पुरुष, व्हेटरन पुरुष, पुरुष डबल्स अशा विविध गटांत घेण्यात येणार आहे. स्पर्धेचे चीफ रेफ्री म्हणून डी. आर. साळसकर व असिस्टंट चीफ रेफ्री पराग अंकोलेकर काम पाहणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष हेमंत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

कै. मोरेश्वर सदाशिव पोतदार व कै. मंगला मोरेश्वर पोतदार यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे टेबल टेनिस स्पर्धेतील पुरुष व महिला विजेत्यास फिरता चषक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेसाठी संघ निवडताना या स्पर्धेतील विजयी खेळाडूंचा विचार केला जाणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होणार्‍या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहितीही देण्यात आली आहे.

# राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाचे सुयश





**पाली : प्रतिनिधी**

स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ४९वी जलतरण व वॉटर पोलो स्पर्धा नुकतीच भुवनेश्वर (ओडिशा) येथे झाली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या वॉटर पोलो संघाने द्वितीय, तर मुलांच्या वॉटर पोलो संघाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. यामध्ये नागोठण्यातील रिलायन्सच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

**रिलायन्स नागोठण्याच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी**

महाराष्ट्राच्या मुलांच्या वॉटर पोलो संघात सुजल भोय, प्रेम पाटील, रोहित कुथे, सार्थक इंद्रे, आदर्श म्हात्रे, दिनांशू कुथे, प्रयाग जैस्वाल, स्वयं परदेशी, कुश परतानी, अर्जुन देशमुख, यश दत्तानी, यदनेश बुगडले, लव परातानी यांचा समावेश होता, तर मुलींच्या संघात प्रेषिता तरे, श्वेता कुराडे, पूर्वा गावडे, श्रावणी सपाटे, जस्मित्कुर राहाल, सृष्टी भोसले, स्वरा पाटील, याना अग्रवाल, मित्वी दत्तनी, नीम शुक्ला, पल्लवी गुडला, श्रकानी अग्रे, दिशा यादव आदींचा समावेश होता.

महाराष्ट्राच्या संघांमध्ये रिलायन्स नागोठण्याचे सात खेळाडू होते. त्यांना आंतरराष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक दत्ता तरे, गितेश कुथे, रोशन कुथे, प्रेमराज पिंगळे यांचे यांचे मार्गदर्शन लाभले. रिलायन्स नागोठणेचे अध्यक्ष शशांक गोयल, विनायक किलोस्कर, उदय दिवेकर, इस्टेटचे मॅनेजर अजिंक्य पाटील, सतीश पाटील, अशोक विधाते, श्री. पाठक आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# रायगड जिल्हा कॅरम स्पर्धेत पनवेलचा सुरेश बिस्ट अजिंक्य



**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनच्या वतीने कॅरम दिन तसेच असोसिएशनचे माजी कार्यवाह स्व. नथुराम पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वैभव राज कॅरम क्लब आयोजित जिल्हा कॅरम अजिंक्यपद व निवड स्पर्धा झाली. स्पर्धेत पुरुष खुल्या गटात पनवेलच्या सुरेश बिस्टने अजिंक्यपद पटकावले. महिला खुल्या गटात खोपोलीच्या अनिता कनोजिया तर वयस्कर गटात कर्जत सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा वाघमारे यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेत ११७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. मुख्य पंच म्हणून विजय टेमघरे, सहाय्यक पंच म्हणून राजेश भूतकर तर तांत्रिक अधिकारी म्हणून दीपक साळवी यांनी काम पाहिले. अजिंक्यपद पटकावणार्‍या सुरेश बिस्ट यांना ज्येष्ठ कॅरम पटू स्व. रामकृष्ण दिवेकर यांच्या स्मरणार्थ उदय दिवेकर यांजकडून रोख सात हजार रुपये तसेच असोसिएशनच्या वतीने फिरता चषक देऊन पत्रकार विजय मांडे, असोसिएशनचे कार्यवाह दीपक साळवी, खजिनदार वैभव पेठे, सदस्य अमित यादव, नंदकुमार दिवेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत पुरुष खुल्या गटात प्रथम सुरेश बिस्ट, द्वितीय अविनाश देशमाने, तृतीय स्वप्नील पनवेलकर, चतुर्थ वैभव शिंदे, पाचवा उत्तम गोरेगावकर, सहावा महेंद्र चोगले, सातवा आश्रब खान आणि आठवा क्रमांक सचिन नाईक यांनी मिळविला. महिला गटात प्रथम अनिता कनोजिया, द्वितीय वेदा शेट, वयस्कर गटात प्रथम कृष्णा वाघमारे, द्वितीय पोपट कवाड यांनी मिळविला.

# इंग्लंडमधील क्रिकेट मैदानाला सुनील गावसकरांचे नाव

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील एका क्रिकेट मैदानाला भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांचे नाव देण्यात आले आहे. इंग्लंडमध्ये भारतीय क्रिकेटला इंग्लंडमध्ये मोठा मान मिळाला आहे.

लिसेस्टर क्रिकेट मैदानाला सुनील गावसकर यांचे नाव देण्यात आले आहे. इंग्लंडमधील एखाद्या क्रिकेट मैदानाला भारतीय क्रिकेटपटूचे नाव देण्याची ही पहिलीच वेळ आहे. लिसेस्टर क्रिकेट मैदानाचे नाव बदलण्याची मोहीम भारतीय वंशाचे खासदार कीथ वाझ यांनी सुरू केली होती.

याबाबत गावसकर म्हणाले, मला खूप आनंद झाला आहे. लिसेस्टरमधील एका मैदानाला माझे नाव देण्यात आले हा माझ्यासाठी खरोखरच मोठा सन्मान आहे. गावसकर हे कसोटी क्रिकेटमध्ये १० हजार धावा करणारे पहिले भारतीय खेळाडू होते. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर होता.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com